

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ,नागपूर




# ई मासिक विद्यासंवाद

सप्टेंबर २०२३| आवृत्ती–०३ब

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ १०० शताब्दी वर्ष १९२३ - २०२३

## सिंथेटिक ट्रॅकचे उपमुख्यमंत्री मा.श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण




विद्येअंगी व्हावा विनय। विद्या करी स्वतंत्र, निर्भय। शिक्षणाने वाढावा निश्चय। जीवन–जय करावया।।

ई मासिक विद्यासंवाद
शताब्दी महोत्सव विशेषांक

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ
१०० शताब्दी वर्ष
१९२३ - २०२३

सप्टेंबर २०२३ | आवृत्ती-०३ब

मार्गदर्शक
डॉ. सुभाष चौधरी
कुलगुरु
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

डॉ. संजय दुधे
प्र-कुलगुरु
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

प्रकाशक
डॉ. राजू हिवसे
कुलसचिव
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

संपादक
श्री. प्रेमदास वाडकर
जनसंपर्क अधिकारी
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर.

मुद्रक
श्री. प्रवीण गोतमारे
प्रकाशन अधिकारी
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ, नागपूर



मा. राज्यपाल
**श्री. रमेश बैस**



मा. कुलगुरु
**डॉ. सुभाष चौधरी**



मा. प्र-कुलगुरु
**डॉ. संजय दुधे**



मा. कुलसचिव
**डॉ. राजू हिवसे**

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या क्रीडा सुविधेत भर

### मिक्स रिले स्पर्धेत रुचिता मिश्टी संघ विजयी

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या रवी नगर चौकातील क्रीडा संकुलाच्या मैदानावर अद्ययावत सिंथेटिक ट्रॅकचे लोकार्पण कोनशिलेचे अनावरण करीत महाराष्ट्र राज्याचे माननीय उपमुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते रविवार, दिनांक १७ सप्टेंबर २०२३ रोजी करण्यात आले.

लोकार्पणप्रसंगी माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, व्यवस्थापन परिषद सदस्य श्री. वामनराव तुर्के, व्यवस्थापन परिषद सदस्य, श्री. अजय चव्हाण, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शरद सूर्यवंशी, अधिष्ठाता डॉ. प्रशांत माहेश्वरी, डॉ. संजय कवीश्वर, डॉ. प्रशांत कडू उपस्थित होते. ट्रॅकच्या उद्‌घाटनप्रसंगी ४ बाय १०० मीटर मिक्स रिले शर्यतीचे आयोजन करण्यात आले. या मिक्स रिले. स्पर्धेचा शुभारंभ आंतरराष्ट्रीय दर्जाच्या नव्या सिंथेटिक ट्रॅकवर उपमुख्यमंत्र्यांच्या शुभहस्ते करण्यात आला. यानंतर उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या शुभहस्ते सिंथेटिक ट्रॅक बांधकाम तांत्रिक समिती सदस्य डॉ. धनंजय वेळूकर, सार्वजनिक बांधकाम विभाग एकात्मिकृत घटक (वैद्यकीय) कार्यकारी अभियंता सौ. अल्पना पाटणे, सार्वजनिक बांधकाम विभाग एकात्मिकृत घटक (वैद्यकीय) कार्यकारी अभियंता सौ. वर्षा घुशे, सार्वजनिक बांधकाम विभाग एकात्मिकृत घटक (वैद्यकीय) उपविभागीय अभियंता अतुल गोटे, सार्वजनिक बांधकाम विभाग एकात्मिकृत घटक (वैद्यकीय) सहाय्यक अभियंता श्रेणी २ प्रवीण मोरे, कनिष्ठ अभियंता आकाश पगारे, मुंबई स्पोर्ट्स फॅसिलिटीचे श्री धर्मेश घिया, अर्जुन यादव, अपेक्षा घिया, मुकुंद घिया यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन प्राचार्य डॉ. सोनाली सूर्यवंशी यांनी केले तर आभार क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ संचालक डॉ. शरद सूर्यवंशी यांनी मानले. कार्यक्रमाला विविध प्राधिकारणी सदस्य अधिकारी, शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

### रुचिता मिश्टी संघ मिक्स रिले स्पर्धेत विजयी

ट्रॅकच्या उद्‌घाटनप्रसंगी रिले स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत आठ संघ सहभागी झाले. या स्पर्धेत प्रथम क्रमांक रुचिता मिश्टी संघाने, द्वितीय पुरस्कार पी. टी. उषा संघ तर तृतीय पुरस्कार मिल्का सिंग संघाने पटकावला. सहभागी संघांना आठ संघांना देशातील आजी-माजी ॲथलिट्सची नावे देण्यात आली होती. पीटी उषा संघात शुभम शिंगाठे- नाम्ह्या फाउंडेशन, गीतल सोनेकर- ट्रॅकस्टार, आदिती बडवाईक- शंकुतला फाउंडेशन, माधव गुप्ता- खेलो इंडिया, आर्यन - फ्युचर क्लब. मिल्खा सिंग संघात फ्युचर क्लबचा विभास, ट्रॅक स्टारची रिया दोहतरे, एनएमकेएमची भार्गवी दुधावकर, नाम्ह्याचा शुभम बैग व सुशांत रिंधे, नीरज चोप्रा संघात एनएमकेएमचा इशान खोडके, फ्युचर क्लबची नेहा ढबाले, नाम्ह्याची वैष्णवी जांभुळकर व अभिषेक साखरवडे, ट्रॅकस्टारचा शादाब पठाण तर अंजूबॉबी जॉर्ज संघात एनएमकेएमचा ओम इटकेलवार, हिंगण्याची अनुष्का बोदिले, बेटिया फाउंडेशनची समिक्षा बागडे, नाम्ह्याचे भावेश देशमुख व ऋषिकेश लोंदे यांचा समावेश आहे. रुचिता मिश्टी संघ- प्रवीण कुमार, आकांक्षा भगत- एनएमकेएम, साक्षी तांबे- नाह्या, केतन दाबे- उमरेड, अथर्व खोपे- खेलो इंडिया. राजीव बालकृष्णन संघ - आदित्य मुळे- उमरेड, सान्वी पाठक- फ्युचर क्लब, मानसी पाटणकर- आई फाउंडेशन, शंतनू मुंडा- हिंगणा, रिषभ मानकर- ३६० क्लब. अविनाश साबळे संघ- राजन यादव- ट्रॅक स्टार, कशीष भगत- शकुंतला, मोहिनी नांदूरकर- बेटिया फाउंडेशन, हर्षल जोगे- उमरेड, भीष्म घोरदडेकर. डॉ. आदिल सुमारीवाला संघ- आदर्श भुरे, राहुल पेटकर- एनएमकेएम, भाग्यश्री महल्ले- खेलो इंडिया, आकांक्षा नागरे- आई फाउंडेशन, विशाल बोरकुटे -३६० क्लब या खेळाडूंचा स्पर्धेत सहभाग होता. यावेळी प्रमुख अतिथींच्या हस्ते विजेत्यांना मेडल देऊन गौरविण्यात आले. यावेळी माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ संचालक डॉ. शरद सूर्यवंशी, डॉ. धनंजय वेळूकर, श्री. विजय मुनीश्वर, सदस्य सौ. विशाखा जोशी, डॉ. माधवी मार्डीकर, धनश्री लेकुरवाळे यांच्यासह अन्य उपस्थित होते.

### आंतरराष्ट्रीय दर्जाचा सिंथेटिक ट्रॅक

विद्यापीठाच्या हा सिंथेटिक ट्रॅक आंतरराष्ट्रीय दर्जाचा असून ट्रॅकवर ४०० मीटरच्या एकूण आठ लेन आहेत. ट्रॅक्टवर पूर्व दिशेला गोळा फेक आणि भालाफेक तर पश्चिम दिशेला हातोडा फेक स्पर्धेसाठी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. दक्षिण दिशेला दोन ठिकाणी लांब उडी व तिहेरी उडीसाठी जम्पिंग पीटची सुविधा असणार आहे. ट्रॅकवर स्टिपल चेस प्रकारासाठी विशेष सुविधा आहे. ट्रॅक खराब होण्यापासून रोखण्यासाठी ड्रेनेज सिस्टीम व्यवस्था आहे. स्पर्धेपूर्वी सरावासाठी मैदानाच्या पूर्व व पश्चिम दिशेला विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. या मैदानावर दिवस- रात्रीचे सामने खेळता येणार आहे.

### मध्यभागी फुटबॉल मैदान

ट्रॅकच्या मध्यभागी फुटबॉल मैदान कायम असून त्यावर जाण्यासह आणि तेथून बाहेर निघण्यासाठी विशेष हायड्रोलिक पूल तयार करण्यात येणार आहे. त्यामुळे सिंथेटिक ट्रॅक खराब होणार नाही. मैदानात नैसर्गिक फुटबॉल फिल्ड असून ऑटोमॅटिक स्प्रिंकलर प्रणाली लावण्यात आली आहे. वातावरण आधारित ही स्प्रिंकलर प्रणाली आहे. पाण्याची कमतरता भासू नये म्हणून दोन लाख लिटर

क्षमतेची टाकी तसेच संपूर्ण परिसरात रेन वॉटर हार्वेस्टिंग करण्यात आले आहेत. ट्रॅकच्या सभोवताली झाडे आणि हिरवळ राहणार आहे. फिनिश पॉईंटवर माध्यम प्रतिनिधी करिता विशेष सुविधा राहणार आहेत. स्पर्धेच्या वेळी फोटोफिनिश करिता इलेक्ट्रिकल पीट राहणार आहे. सिंथेटिक ट्रॅक आणि ॲथलेटच्या सुरक्षेकरिता ४५०० चौरस मीटर इंटरलॉक राहणार आहे.

## आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रमाणपत्र

सिंथेटिक ट्रॅकला आंतरराष्ट्रीय दर्जा प्राप्त झाला आहे. वर्ल्ड ॲथलेटिक्स संघटनेचे सीईओ जॉन रिडगॉन यांनी सिंथेटिक ट्रॅकला आंतरराष्ट्रीय वर्ग २ ॲथलेटिक्स सुविधायुक्त ट्रॅकचा दर्जा प्राप्त प्रमाणपत्र काही दिवसांपूर्वी प्रदान केले आहे.











# खनिज संपत्ती देशाची अर्थसंपदा

## भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण विभागाचे उपमहासंचालक श्री विजय मुगल यांचे प्रतिपादन

### पदव्युत्तर भूगर्भशास्त्र विभागात इंडक्शन कार्यक्रम










खनिज संपत्ती ही देशाची अर्थसंपदा असल्याचे प्रतिपादन भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण विभागाचे उपमहासंचालक श्री विजय मुगल यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर भूगर्भशास्त्र विभागात इंडक्शन कार्यक्रम शुक्रवार, दिनांक ८ सप्टेंबर २०२३ रोजी पार पडला. या कार्यक्रमात विशेष अतिथी म्हणून श्री मुगल बोलत होते.

माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पदव्युत्तर भूगर्भशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. कीर्तीकुमार रणदिवे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण विभागाचे उपमहासंचालक श्री विजय मुगल, खाण मंत्रालयाचे संचालक श्री. मिलिंद धकाते, विद्यापीठ आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. निशिकांत राऊत यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना श्री. मुगल यांनी आपल्या आयुष्यातील प्रत्येक दिवसाची सुरुवात भूगर्भशास्त्राशी संबंधित वस्तूंपासून होत असल्याचे सांगत याबाबत अनेकांना माहिती नसल्याचे ते म्हणाले. भूगर्भशास्त्र देशाची अर्थव्यवस्था चालवीत आहे. खनिजे देशाची अर्थसंपदा असल्याने भारत सरकारचे याकडे विशेष लक्ष आहे. भूगर्भशास्त्रात पूर्वी शैक्षणिक क्षेत्रापूरती संधी मर्यादित होती. मात्र, आता सरकारी तसेच खाजगी अशा विविध क्षेत्रांमध्ये भूगर्भशास्त्र विषयाला संधी प्राप्त होत आहे. देशात महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि छत्तीसगड ही तीन राज्ये खनिज संपत्तीच्या बाबतीत महत्त्वपूर्ण असल्याचे मुगल म्हणाले. या क्षेत्रामध्ये भविष्य उज्वल असून तुमच्या मधील अनेक जणांना केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्यांमध्ये पाहत असल्याचे श्री मुगल म्हणाले. नागपूर हे भूगर्भ शास्त्र विषयाचे हब असून महिला देखील या क्षेत्रामध्ये भरीव कामगिरी करीत आहे. त्यामुळे स्पर्धा परीक्षेवर लक्ष केंद्रित करण्याचे आवाहन त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना केले.

खान मंत्रालयाचे संचालक श्री. मिलिंद धकाते यांनी मार्गदर्शन करताना भूगर्भशास्त्र विषयात रोजगाराच्या अनेक संधी असल्याचे सांगितले. या शास्त्रामध्ये अनेक उपविषय असून पदव्युत्तर शिक्षणामध्ये त्यातील एक उपविषय घेत तुम्ही तुमचे आयुष्यातील ध्येय निश्चित करीत यशस्वी होऊ शकता, असे धकाते म्हणाले. विद्यापीठ आजीवन अध्ययन व विस्तार विभाग संचालक डॉ. नितीन राऊत यांनी विभागामार्फत सुरू असलेल्या कौशल्य अभ्यासक्रमांची माहिती दिली. यामध्ये संस्कार, सक्षम, सहयोग आणि उन्नती अशा चार प्रकारांमध्ये विभागाकडून ऑनलाइन व ऑफलाईन अभ्यासक्रम चालविले जात असल्याचे त्यांनी सांगितले. अध्यक्षीय भाषण करताना विभाग प्रमुख डॉ. कीर्तीकुमार रणदिवे यांनी नवीन प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत करीत आयुष्यामध्ये शिस्त ही अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याचे सांगितले. शिक्षक तुम्हाला शिकविणारच आहे. मात्र, तुम्ही किती शिकता यावर तुमचे यश अवलंबून असल्याचे डॉ. रणदिवे म्हणाले. देश तसेच राज्यातील अत्यंत जुना व मोठा असलेला विभाग म्हणून भूगर्भशास्त्र विभागाची ओळख असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रमुख अतिथींच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. विद्यार्थिनी पलक वासनिक हिने नृत्य सादर केले. कार्यक्रमामध्ये विभागातील शिक्षक, संशोधक विद्यार्थी तसेच केंद्रीय लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थी अतुल नारकर यांचा प्रमुख अतिथींच्या हस्ते सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या विविध कलाकृतींच्या प्रदर्शनीची पाहणी प्रमुख अतिथींनी केली. यावेळी पारुल धकाते या विद्यार्थिनीने शिक्षकांचा व अतिथींचा परिचय करून दिला. कार्यक्रमाचे संचालन वैष्णवी ठाकरे व पारुल धकाते यांनी केले तर आभार तानिया पालीवाल या विद्यार्थिनींने मानले. कार्यक्रमाला विभागातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.






## रासेयोने स्वच्छतेविषयी समाजामध्ये जागृती करावी
## माननीय प्र -कुलगुरू डॉ. संजय दुधे यांचे प्रतिपादन

राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी समाजामध्ये स्वच्छतेविषयी जनजागृती करावी, असे प्रतिपादन माननीय प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचा छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसरातील दीक्षांत सभागृह येथे एक दिवसीय स्वच्छता कृती योजना कार्यक्रम शुक्रवार, दिनांक ८ सप्टेंबर २०२३ रोजी पार पडला. यावेळी अध्यक्षस्थानावरून प्र-कुलगुरु डॉ. दुधे मार्गदर्शन करीत होते.

दीक्षांत सभागृहात आयोजित कार्यक्रमात माननीय प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांनी अध्यक्षस्थान भूषविले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. सोपानदेव पिसे, जिल्हा कार्यक्रमाधिकारी प्रा. राजू बुरीले उपस्थित होते. यावेळी पुढे मार्गदर्शन करताना प्र-कुलगुरु डॉ. दुधे यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व वैराग्यमूर्ती संत गाडगेबाबा यांचे स्वच्छते विषयी विचार विद्यार्थ्यांना सांगितले. आपण राहत असलेल्या परिसरामध्ये स्वच्छता असल्यास आरोग्य उत्तम राहण्यास मदत होत असल्याचे ते म्हणाले. यानंतर सहभागी विविध महाविद्यालयांमधील राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांनी विद्यापीठाचा छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, फ्रीडम पार्क व महाराज बाग परिसरात प्लास्टिक निर्मूलन तसेच स्वच्छता उपक्रम राबविला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रासेयो विभागातील प्रकाश शुक्ला व स्वयंसेवकांनी प्रयत्न केले.






## विद्यापीठाच्या क्रीडा विभागातर्फे डॉ. सी. पी. सिंग यांचा सत्कार



इंडियन फ्लोअरबॉल फेडरेशन, फ्लोअरबॉल असोसिएशन ऑफ महाराष्ट्र तर्फे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या सहकार्याने सुरु असलेल्या १७ व्या राष्ट्रीय फ्लोअरबॉल पुरुष-महिला चॅम्पियनशीप स्पर्धा रवी नगरातील विद्यापीठ मैदानावर सुरु आहे. यानिमित्ताने नागपुरात आलेले डॉ. सी. पी. सिंग यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाला भेट दिली. यावेळी नागपूर विद्यापीठाच्या क्रीडा विभागाबद्दल त्यांनी माहिती जाणून घेतली.

याप्रसंगी लक्ष्मीबाई नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फिजिकल एज्युकेशन ग्वाल्हेर विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. सिंग यांचा विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद सुर्यवंशी यांनी शाल, श्रीफळ आणि पुष्पमाला घालून स्वागत केले. शिक्षण क्षेत्रात तब्बल ३५ वर्ष अनुभव असलेले डॉ. सिंग हे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माजी ॲथलेटिक्स खेळाडू होते. शिवाय ॲथलेटिक्स स्पर्धेत त्यांनी नागपूर विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व देखील केले आहे. शारीरिक शिक्षण विषयक विविध राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय कार्यशाळेत डॉ. सिंग यांनी उपस्थिती दर्शविलीअ हो. शिवाय ऑल इंडिया युनिव्हर्सिटीच्या स्पर्धेत त्यांनी निरीक्षकांची भुमिकाही बजाविली आहे. नागपूर विद्यापीठाच्या क्रीडा सुविधा बघून त्यांनी समाधान व्यक्त केले. याप्रसंगी नागपूर जिल्हा फ्लोअर बॉल संघटनेच्या सचिव स्नेहल भगत, जळगाव फ्लोअर बॉल संघटनेचे सचिव दीपक वाडे आदी उपस्थित होते.



## दिल्ली संघाला विजेतेपदाचे दुहेरी मुकूट राष्ट्रीय फ्लोअरबॉल स्पर्धा

### महिला गटात महाराष्ट्र तिसऱ्या स्थानी

उत्कृष्ट खेळाच्या जोरावर इंडियन फ्लोअरबॉल फेडरेशन, फ्लोअरबॉल असोसिएशन ऑफ महाराष्ट्रतर्फे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या शताब्दी वर्षानिमित्त घेण्यात आलेल्या १७ व्या राष्ट्रीय फ्लोअरबॉल स्पर्धेत महिला व पुरुष गटात दिल्ली संघाने विजेतेपदाचा मान प्राप्त केला.

रवी नगरातील विद्यापीठाच्या मैदानावर महिला गटात झालेल्या अंतिम लढतीत दिल्ली संघाने ३-२ अशा गोलने हरयाणा संघाचा पराभव करीत विजेतेपद प्राप्त केले. तिसऱ्या स्थानासाठी झालेल्या लढतीत महाराष्ट्र संघाने बाजी मारली. महाराष्ट्राने तामिळनाडूचा ४-२ गोलने पराभव करीत हे यश प्राप्त केले.

पुरुष गटात झालेल्या अंतिम लढतीत दिल्ली संघाने कर्नाटकाला पेनॉल्टी शुटमध्ये २-० ने मात दिली. सामना सुरु होताच दोन्ही संघाच्या खेळाडूंनी बरोबरीचा खेळ केला. त्यामुळे निर्धारीत वेळेत दोन्ही संघाचे २-२ अशी समान गोलसंख्या होती. त्यामुळे सामन्याचा निकाल पेनॉल्टी शुटने लावण्यात आला. यात दिल्लीच्या खेळाडूंनी बाजी मारली. तर तिसऱ्या स्थानासाठी झालेल्या लढतीत यजमान महाराष्ट्राला मध्यप्रदेश संघाकडून ४-२ अशा गोलने पराभव स्वीकारावा लागला.

स्पर्धेतील विजेत्यांना डॉ. शरद सूर्यवंशी यांच्या हस्ते चषक व प्रशस्तीपत्र देउन सन्मानित करण्यात आले आहे. याप्रसंगी बक्षीस वितरण कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान इंडियन फ्लोअरबॉल फेडरेशनचे अध्यक्ष हरिंदर कुमार, तर प्रमुख अतिथी म्हणून रातुम नागपूर विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद सुर्यवंशी, जिल्हा क्रीडा अधिकारी पल्लवी धात्रक, ग्वाल्हेर विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. सी. पी. सिंग, आयएफएफचे सरचिटणीस प्रदीप सिंग , फ्लोअरबॉल असो. ऑफ महाराष्ट्राचे सरचिटणीस रवींद्र चौथवे, पोद्दार इंटरनॅशनल शाळेचे प्राचार्य एस. एन. साहू, फ्लोअरबॉल असोसिएशन अध्यक्ष शिवछत्रपती पुरस्कार प्राप्तत लक्ष्मी चौरे आदी उपस्थित होते.





## भंडारा जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी 'ग्राम चलो अभियानाची' दिशा निश्चित

### माननीय कुलगुरूंची जिल्हाधिकारी व अधिकाऱ्यांसोबत चर्चा

भंडारा जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाकरिता 'ग्राम चलो अभियानाची' दिशा निश्चित करण्यात आली आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी भंडारा जिल्ह्याचा सामाजिक व आर्थिक विकास व्हावा म्हणून जिल्हाधिकारी श्री. योगेश कुंभेजकर व जिल्हा प्रशासनातील अन्य अधिकाऱ्यांसोबत सोमवार, दिनांक ११ सप्टेंबर २०२३ रोजी झालेल्या बैठकीत चर्चा केली.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाकडून शताब्दी महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने 'रिचिंग टू अनरीच्ड' अभियान राबविले जात आहे. या अभियान अंतर्गत स्थानिक नैसर्गिक संसाधनांचा वापर करून रोजगाराची साधने उपलब्ध करून देत ग्रामीण भागातील नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्न केले जात आहे. भंडारा जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीला माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, जिल्हाधिकारी श्री. योगेश कुंभेजकर, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू, पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ नागपूरचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. अनिल भिकाने, विद्यापीठ जीवन शिक्षण आणि विस्तार विभाग सदस्य डॉ. कल्पना पांडे, मत्स्य विज्ञान

विद्यालय, नागपूरचे सहा. प्राध्यापक, डॉ. सचिन बेलसरे, रेशिम विभाग मार्गदर्शक डॉ. सुरेश रैना, जिल्हा नियोजन अधिकारी शशीकुमार बोरकर, विद्यापीठ रेशीम विभागातील श्री. प्रताप शुक्ला आदी उपस्थित होते.

भंडारा जिल्ह्यातील गोसेखुर्द पुनर्वसन क्षेत्रातील ३४ गावांचे सर्वेक्षण करून तेथील नागरिकांचे जीवनमान सुधारण्याबाबत विविध उपक्रम राबविण्याबाबत बैठकीत चर्चा करण्यात आली. या बैठकीमध्ये रेशीम विभागातील अधिकारी श्री. रैना व विद्यापीठाचे रेशीम विभागातील प्रतिनिधी यांनी मलबेरी व टसर सिल्क उत्पादन वाढविण्याबाबत माहिती दिली. त्या अनुषंगाने भंडारा जिल्ह्यातील रेशीम विभाग काम करणार आहे. जिल्ह्यामध्ये उपलब्ध पशुधनाच्या माध्यमातून दुधाचे उत्पादन वाढविण्याकरिता महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ ग्रामीण भागात प्रसार प्रचार करणार आहे. सोबतच दोन्ही विद्यापीठाकडून पुनर्वसन झालेल्या भागातील सुशिक्षित युवकांसाठी प्रधानमंत्री रोजगार निर्मिती योजना (PMEGP) व मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजना (CMEGP) अंतर्गत मत्स्य पालनातून उद्योग निर्मितीची शक्यता तपासत उद्योग उभा करण्यास मदत केली जाणार आहे. जिल्ह्यातील विविध उत्पादनांचे व योजनांचे डिजिटल मार्केटिंग करण्याबाबत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ जिल्हा प्रशासनामार्फत मदत करणार आहे. राष्ट्रीय कौशल्य परिषदेने निश्चित केलेल्या निकषाच्या आधारे आत्मा व कृषी विभागासोबत मिळून कौशल्य विकास कार्यक्रम राबविणार आहे. या महत्त्वपूर्ण विषयांवर बैठकीत जिल्ह्यातील अधिकाऱ्यांसोबत चर्चा करण्यात आली. त्यानंतर जिल्हाधिकारी श्री. योगेश कुंभेजकर यांनी समन्वय साधून पथदर्शी कृती आराखडा पुढच्या सभेत ठेवण्याचे निर्देश संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले.

## प्रत्येक मनाला शिकवण देईल तोच विश्वगुरू
## पूज्यपाद स्वामी पितांबरानंद यांचे प्रतिपादन
### राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात राष्ट्रसंत व्याख्यानमाला







विश्वरूप म्हणजे संपूर्ण जगाला एकच शिकवण देणे नव्हे. या जगात अनेक व्यक्तींची अनंत मने आहेत. त्या प्रत्येक मनाला शिकवण देईल तोच विश्वगुरू आहे, असे प्रतिपादन रामकृष्ण संघ बेलूर मठ येथील वरिष्ठ संन्यासी मा. पूज्यपाद स्वामी पितांबरानंद यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात शताब्दी पर्व निमित्त राष्ट्रसंत व्याख्यानमाला आयोजित केली जात आहे. विद्यापीठाच्या जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात सोमवार, दिनांक ११ सप्टेंबर २०२३ रोजी सायंकाळी व्याख्यान मालेतील पाचवे पुष्प गुंफतांना पूज्यपाद स्वामी पितांबरानंद बोलत होते.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांनी भूषविले. यावेळी व्यासपीठावर अतिथी वक्ता म्हणून रामकृष्ण संघ बेलूर मठ येथील वरिष्ठ संन्यासी मा. पूज्यपाद स्वामी पितांबरानंद, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, राष्ट्रसंत अध्यासन प्रमुख डॉ. विजयालक्ष्मी थोटे यांची उपस्थिती होती. 'जगावे कसे हे स्वामी विवेकानंदांनी शिकवावे' या विषयावर पुढे मार्गदर्शन करताना स्वामी पितांबरानंद यांनी स्वामी विवेकानंद यांचा जीवनपट व्याख्यानात उलगडला. अमेरिकेतील शिकागो शहरात ११ सप्टेंबर १८९३ मध्ये झालेल्या धर्म संसदेत स्वामी विवेकानंदांनी केलेल्या भाषणाने संपूर्ण

जगाला प्रभावित केले. स्वामी विवेकानंद यांनी त्यांच्या सात मिनिटाच्या भाषणामध्ये मनुष्य हाच ईश्वर तसेच प्रत्येक जीव अव्यक्त ब्रह्म आहे असे सांगितल्याचे स्वामी पितांबरानंद म्हणाले. आज धर्माचा वेगळा अर्थ काढला जातो. अध्यात्मच हा माणसाचा धर्म आहे. मात्र, या मानवी धर्मात कर्मकांडाला महत्व नसल्याचे स्वामी म्हणाले. ज्ञानमार्ग चांगला असला तरी तो शुष्क असतो, भक्ती मार्गाला उदात्त महत्व असले तरी नष्ट होण्याची भीती असते. त्यामुळे यात एकमेकांशी न भांडता एकत्र राहिले पाहिजे. श्री रामकृष्ण यांचे जीवन या समन्वयाचे मूर्तीमंत आदर्श आहे.

त्यांच्या आयुष्यातील एक-एक पैलूंचा उलगडा केल्यास आदर्श जीवन तयार होते. यावेळी स्वामी पितांबरानंद यांनी संन्यासी व गृहस्थ जीवन, शंकराचार्य, वेद, असांप्रदायिक समुदाय, गुरु- शिष्य परंपरा, विश्व धर्माचा व्यापक विचार याबाबत विस्तृत माहिती दिली.

यावेळी अध्यक्षीय भाषण करताना प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांनी स्वामी विवेकानंद यांनी शिकागो येथे केलेल्या भाषणाबाबत माहिती दिली. त्यांचे कर्मयोग, अध्यात्म योग, धर्मयोग हे संपूर्ण मानवी समाजाच्या उन्नतीसाठी असल्याने स्वामी विवेकानंद हेच विश्वगुरू असल्याचे म्हटले. स्वामी विवेकानंद यांच्या रूपाने सामाजिक विचार पेरणारा तारारा निर्माण झाल्याचे ते म्हणाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना राष्ट्रसंत अध्यासन केंद्र प्रमुख डॉ. विजयालक्ष्मी थोटे यांनी व्याख्यान माला आयोजित करण्याबाबतची माहिती दिली. सोबत व्याख्याते म्हणून उपस्थित राहिल्याने स्वामी पितांबरानंद यांचे आभार मानले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. अमृता इंदूरकर यांनी केले तर आभार डॉ. विजयालक्ष्मी थोटे यांनी मानले कार्यक्रमाला मोठ्या संख्येने विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.







## विद्यार्थ्यांसाठी ज्ञानाचे भांडार खुले केले - कुलगुरू पदव्युत्तर जनसंवाद विभागात परिचय कार्यक्रम







नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने विद्यार्थ्यांसाठी ज्ञानाचे भांडार खुले केले असल्याचे प्रतिपादन माननीय कुलगुरू डॉ सुभाष चौधरी यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर जनसंवाद विभागात परिचय कार्यक्रम बुधवार दिनांक १३ सप्टेंबर २०२३ रोजी पार पडला. या कार्यक्रमात अध्यक्ष स्थानावरून कुलगुरू डॉ. चौधरी बोलत होते. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा माहिती अधिकारी श्री. प्रवीण टाके, नागपूर आकाशवाणीच्या कार्यक्रम अधिकारी (प्रोग्राम हेड) सौ. रचना पोपटकर (गजभिये), विभाग प्रमुख डॉ. मोईज मन्नान हक यांची उपस्थिती होती.

स्वतःचा परिचय करून देत कुलगुरू डॉ. चौधरी यांनी भाषणाची सुरुवात करीत जनसंवाद विभागात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत केले. कोणतेही क्षेत्र मर्यादित नाही. नवीन शैक्षणिक धोरणानुसार शिक्षण हे आंतरविद्या शाखीय झाले आहे. सर्व विषयांचे ज्ञान असेल तर संबंधित विषयामध्ये कौशल्य प्राप्त असेल तरच तो व्यक्ती जगात तग धरू शकतो. आता तर तंत्रज्ञानाच्या प्रगतीने सर्वच गोष्टी एका डिवाइस मध्ये आल्या आहे. त्यामुळे विविध कौशल्य असलेल्या व्यक्तीस कोणत्याही कंपनीमध्ये चांगली संधी मिळते त्यामुळे सर्व गोष्टी शिकायला पाहिजे, असे कुलगुरू म्हणाले. एनईपी २०२० मध्ये वर्गातील शिक्षण २५ टक्क्यावर आणले असून ७५ टक्के शिक्षण हे प्रात्यक्षिकावर आधारित आहे. त्यामुळे शिक्षक हे आता केवळ मार्गदर्शकाच्या भूमिकेत राहणार आहे. मुलांना स्वतः शिकत क्रेडिट प्राप्त करावे लागणार आहे. कशा प्रकारची रचना तयार व्हावी म्हणून कुलगुरू म्हणून आल्यानंतर सर्वप्रथम सर्व विभागांना स्वायत्तता प्रदान करण्याचा निर्णय घेतला असल्याचे डॉ. चौधरी यांनी सांगितले. आर्टिफिशियल इंटेलिजन्स (AI) चे उदाहरण देत नवीन तंत्रज्ञानाचा वापर करणे आवश्यक असल्याचे ते म्हणाले.

प्रमुख अतिथी जिल्हा माहिती अधिकारी श्री. प्रवीण टाके यांनी पत्रकारिता क्षेत्रातील विविध संधी व आव्हानांबाबत माहिती दिली. जनसंवाद हे असे क्षेत्रातील विद्यार्थी बेरोजगार असल्याचे आढळून येत नाही. गुणवत्तेनुसार या क्षेत्रात संधी मिळते. लेखक, बातमीदार, आकलन वैशिष्ट्य, वक्तृत्व,

तंत्रज्ञानाची माहिती आदी तुमच्यामधील कला तुम्हाला पुढे घेऊन जाते. देशाच्या मध्यभागी असलेले नागपूर या ठिकाणी माध्यमांमध्ये काम केलेल्या व्यक्तींचे फार मोठे वलय आहे. सोबतच पत्रकारिता हा आवडीचा विषय असेल तर या क्षेत्रात तुमचे भविष्य उज्वल असल्याचे टाके पुढे बोलताना म्हणाले.







प्रमुख अतिथी नागपूर आकाशवाणीच्या कार्यक्रम अधिकारी सौ. रचना पोपटकर यांनी आकाशवाणीच्या कार्याबाबत माहिती दिली. आकाशवाणी हे एक प्रसिद्ध जनसंवादाचे माध्यम असून मनोरंजन आणि माहिती याचा समन्वय साधून कार्य करीत असल्याचे ते म्हणाले. आकाशवाणीमध्ये अभियांत्रिकी, कार्यक्रम, बातमी विभाग असे विविध विभाग आहेत. बदलत्या तंत्रज्ञानात आकाशवाणी देखील डिजिटल माध्यमात आली आहे. या क्षेत्रामध्ये रेडिओ जॉकी, डबिंग आर्टिस्ट, स्क्रिप्ट रायटर, कंटेंट रायटर, ब्रॉडकास्ट प्रोड्यूसर आदी विविध संधी असल्याचे त्यांनी सांगितले. शिक्षण घेत असताना ज्ञान मिळविण्याचा प्रयत्न करा, असे ही त्या म्हणाल्या. विभाग प्रमुख डॉ. मोईज मन्नान हक यांनी प्रमुख अतिथींचे स्वागत करून कार्यक्रमाची रूपरेषा प्रास्ताविक करताना सांगितली. विभागातील विद्यार्थ्यांकडून कॅम्पस पत्रिका काढली जात असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी प्रमुख अतिथींच्या शुभहस्ते कॅम्पस पत्रिका तसेच आजादी का अमृत महोत्सव बुकलेटचे विमोचन करण्यात आले. या कार्यक्रमात नव्याने प्रवेशित विद्यार्थी यांचा परिचय घेण्यात आला तर माजी विद्यार्थ्यांनी त्यांचे अनुभव यावेळी सांगितले. कार्यक्रमाचे संचालन अश्विनी चौधरी तर आभार जान्हवी भगत या विद्यार्थिनीने मानले.

## रसायनशास्त्र विभागात 'केमिकल सोसायटी' उद्घाटित




राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर रसायनशास्त्र विभागात 'केमिकल सोसायटी'चे उद्घाटन करण्यात आले. नीरीचे वरिष्ठ वैज्ञानिक डॉ. हर्षवर्धन सिंह यांच्या शुभहस्ते केमिकल सोसायटीचे उद्घाटन बुधवार, दिनांक १३ सप्टेंबर २०२३ रोजी पार पडले.

पदव्युत्तर रसायनशास्त्र विभागातील सभागृहात झालेल्या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून निरीचे वरिष्ठ वैज्ञानिक डॉ. हर्षवर्धन सिंह, पदव्युत्तर रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. एन. एन. करडे, सोसायटीचे प्रभारी शिक्षक डॉ. राजेंद्र डोंगरे यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. विभाग प्रमुख डॉ. एन. एन. करडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना विभागात केमिकल सोसायटीची का आवश्यकता आहे, याबाबत माहिती दिली. सोबतच नव्याने नियुक्त झालेल्या केमिकल सोसायटी पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. प्रमुख अतिथी डॉ. हर्षवर्धन सिंह यांनी रसायनशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांना पर्यावरण क्षेत्रात भविष्यात मोठ्या संधी असल्याचे सांगितले. पर्यावरण क्षेत्रासोबतच विविध उद्योगांमध्ये रसायनशास्त्र विषयातील विद्यार्थ्यांना विशेष मागणी आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी पदवी नंतर चांगली संधी मिळावी म्हणून त्या दृष्टीने प्रयत्नरत राहण्याचे आवाहन त्यांनी केले. नागपूर शहराच्या आजूबाजूला असलेल्या विविध प्रकारच्या प्रदूषण पातळीची माहिती त्यांनी दिली.

शहरामध्ये असलेली नागनदी, फुटाळा व अंबाझरी तलाव या नैसर्गिक जलस्त्रोत प्रदूषणामुळे मोठ्या प्रमाणात बाधित होत असल्याची चिंता त्यांनी व्यक्त केली. या नैसर्गिक जलस्त्रोतांचे संवर्धन व्हावे म्हणून रसायनशास्त्र विषयातील विद्यार्थ्यांनी या दृष्टीने संशोधनात्मक कार्य करावे आणि त्यातून संधी शोधाव्यात असे डॉ. सिंह म्हणाले. कार्यक्रमांमध्ये केमिकल सोसायटी २०२३ -२४ चे अध्यक्ष म्हणून चैतन्य गाडेकर, उपाध्यक्षपदी पृथा देवईकर, सचिवपदी आचल यादव, सहसचिव पदी विभा तातेड, कोषाध्यक्ष पदी जान्हवी धोटे, सह कोषाध्यक्ष पदी सृष्टी पवार आणि प्राप्ती शामकुवर यांची नियुक्ती करण्यात आली. खेळाडू म्हणून तेजस ढेपे, सोनाली पाल, ऋतुजा यांची तर सदस्य म्हणून श्वेता नगराळे, अमित दुर्वे, प्रतीक भगत, प्राश वाघमारे यांची नियुक्ती करण्यात आली. ज्यावेळी कार्यक्रमाला विभागातील शिक्षक डॉ. रवी जुगादे, डॉ. एम. आर. लांजेवार, डॉ. विजय तांगडे यांच्यासह युवा संशोधक व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.





# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण नवीन युगाच्या भारताची आवश्यकता

## प्रो. सूर्य प्रसाद दीक्षित यांचे प्रतिपादन

## हिंदी विभागात नवीन शैक्षणिक धोरणावर राष्ट्रीय चर्चासत्र












नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे बदलत्या भारताची आवश्यकता आहे. या धोरणामध्ये भारताच्या सर्वांगीण विकासाची संकल्पना दडली आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात भारतीय भाषा आणि भारतीय ज्ञान परंपरेला आधार बनविण्यावर भर देण्यात आल्याचे प्रतिपादन प्रसिद्ध साहित्यिक प्रो. सूर्य प्रसाद दीक्षित यांनी केले. महाराष्ट्र राज्य हिंदी साहित्य अकादमी मुंबई, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ हिंदी विभाग, शिक्षण- संस्कृती उत्थान न्यास नवी दिल्ली आणि महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा पुणे विदर्भ प्रांत यांच्या संयुक्त विद्यमाने हिंदी विभागात बुधवार दिनांक २० व गुरुवार दिनांक २१ सप्टेंबर २०२३ रोजी आयोजित दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्घाटन करताना प्रो. दिक्षित मार्गदर्शन करीत होते.

'नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि भारतीय भाषा' या विषयावर पुढे बोलताना प्रो. सूर्य प्रसाद दीक्षित यांनी भारतीय भाषांना शिक्षणाचा आधार बनविल्यास ज्ञान -विज्ञान आदी सर्व क्षेत्रात अधिक चांगले परिणाम मिळतील असे सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून मार्गदर्शन करताना प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ हे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना भारताच्या विविधतेचा परिचय करून देणार असल्याचे सांगितले. भारत विविधतेने संपन्न असा देश आहे. आपल्या देशात भाषा, वेशभूषा, साहित्य, रंग आदी सर्वांमध्ये विविधता आहे. त्यानंतर देखील आपण एक आहोत. एक सोबत राहत असून हीच आपली विशेषता आहे. कारण आपणास आपल्या ज्ञान परंपरेने एकात्मतेचे सूत्र दिले असल्याचे डॉ. दुधे म्हणाले.

प्रमुख अतिथी महाराष्ट्र राज्य हिन्दी साहित्य अकादमी, मुंबईचे कार्याध्यक्ष डॉ. शीतला प्रसाद दुबे यांनी मार्गदर्शन करताना नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण लागू करताना येणाऱ्या अडचणी रेखांकित करून भारतीय भाषांच्या माध्यमातून त्या समस्यांची चांगल्या प्रकारे सोडवणूक करता येईल असे सांगितले. आपल्या भाषांना शिक्षणाचे माध्यम बनविल्यास देशातील सामान्य व्यक्ती देखील शिक्षणाप्रती जागरूक होईल. मध्य प्रदेश लोक सेवा आयोगाच्या माजी सदस्या श्रीमती शोभाताई पैठणकर यांनी विशिष्ट अतिथी म्हणून बोलताना नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण भारताच्या चौफेर विकासाचे स्वप्न असल्याचे सांगितले. यावेळी अकादमीचे सदस्य अजय पाठक यांनी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या विद्यमान स्थितीत आवश्यकतेवर प्रकाश टाकला. महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा पुणे विदर्भ प्रांत अध्यक्ष अजय पाटील यांनी हे राष्ट्रीय चर्चासत्र देशाच्या विकासासाठी महत्वपूर्ण असल्याचे सांगितले.

प्रास्ताविक करताना हिंदी विभाग प्रमुख डॉ. मनोज पांडे यांनी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण भारतीय ज्ञान परंपरा, महात्मा गांधी यांचे सर्व समावेशक सिद्धांत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे न्याय सिद्धांत आणि आत्मनिर्भर भारताचे स्वप्न साकार करणारे मॉडेल असल्याचे सांगितले. यावेळी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात भारतीय भाषा संबंधी तरतूद आणि त्यावर देशातील विचारवंतांच्या मतांचे संकलन ' राष्ट्रीय शैक्षणिक धोरण: अभिमत आणि तरतूद' तसेच हिंदी विभागाकडून प्रकाशित त्रैमासिक पत्रिका 'विद्यार्थी दृष्टी' चे विमोचन करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. संतोष गिरहे यांनी केले तर अकादमीचे सदस्य जगदीश प्रसाद थपलियाल यांनी आभार मानले. यावेळी डॉ. कृष्ण नागपाल, नरेंद्र परिहार, कृष्ण कुमार द्विवेदी, डॉक्टर सपना तिवारी, सुषमा नरांजे, संतोष बादल, अविनाश बागडे, अनिल मालोकर, देवयानी बनर्जी, एसपी सिंह सहित अनेक गणमान्य नागरिक आणि विद्यार्थी उपस्थित होते.






## फिलिपिन्स येथे मानवाधिकार चर्चासत्रात डॉ. पायल ठावरे यांचा सहभाग

आशिया आणि पॅसिफिकमधील मानवी हक्क आणि स्थानिक प्रशासन या विषयावरील फिलीपिन्समधील मनिला येथे ६ व ७ सप्टेंबर २०२३ रोजी झालेल्या चर्चासत्रात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या पदव्युत्तर विधी विभागाच्या विभाग प्रमुख डॉ. पायल ठावरे यांनी सहभाग घेतला. या आंतरराष्ट्रीय चर्चासत्रामध्ये भारतातून डॉ. ठावरे यांना एकमेव 'पॅनलिस्ट' म्हणून आमंत्रित करण्यात आले होते.




आशिया-पॅसिफिक देशांमधील स्थानिक धोरणे आणि कार्यक्रमांमध्ये मानवी हक्क-आधारित दृष्टीकोन (HRBA) एकत्रित करण्याशी संबंधित आव्हाने आणि नवकल्पना या चर्चासत्रात चर्चा करण्यात आली. डॉ. पायल ठावरे यांनी त्यांच्या चर्चेत अंमलबजावणीत येणाऱ्या आव्हानांवर मात करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे राबविण्यात येणार्या चरण-दर-चरण प्रक्रियेबाबत माहिती दिली. या चर्चासत्रात दक्षिण कोरिया, इंडोनेशिया, पापुआ न्यू गिनी, बांग्लादेश, नेपाळ आणि फिलिपाइन्स यासारख्या विविध आशिया-पॅसिफिक देशांतील तज्ज्ञांनी भाग घेतला. डॉ. ठावरे ह्या भारतातून निमंत्रित केलेल्या एकमेव पॅनेल सदस्य होत्या. हे आंतरराष्ट्रीय प्रादेशिक चर्चासत्र राऊल वॅलेनबर्ग इन्स्टिट्यूट ऑफ ह्यूमन राइट्स अंड ह्युमॅनिटेरियन लॉ, जकार्ता यांच्याकडून आयोजित करण्यात आले होते. स्वीडिश इंटरनॅशनल कोऑपरेशन डेव्हलपमेंट एजन्सीने या चर्चासत्राला सहकार्य केले. डॉ. ठावरे यांनी २०२० ते २०२३ पर्यंत राऊल वॉलनबर्ग इन्स्टिट्यूट ऑफ ह्युमन राइट्स अँड ह्युमॅनिटेरियन लॉ, स्वीडन येथे तीन आंतरराष्ट्रीय संशोधन प्रकल्प पूर्ण केले आहेत.



## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात पं. दिनदयाल उपाध्याय जयंती

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात पंडित दिनदयाल उपाध्याय यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी उपकुलसचिव डॉ. राजेंद्र उतखेडे यांनी पंडित दिनदयाल उपाध्याय यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला उपकुलसचिव प्रदीप बिनीवाले, शैलेश राठोड, स्वप्निल मोडक, कवडू भोयर, नितीन खरबडे, चेतन इंगळे, अनिल खरे, आसिफ शेख व अन्य उपस्थित होते.










## राष्ट्र विकासात रासेयोचे मोठे योगदान - कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी

## विद्यापीठस्तरीय राष्ट्रीय सेवा योजनेचा पुरस्कार वितरण सोहळा

राष्ट्रीय सेवा योजनेचे राष्ट्राच्या विकासात मोठे योगदान असल्याचे प्रतिपादन माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजनेचा पुरस्कार वितरण सोहळा महाराज बाग स्थित छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसरातील दीक्षांत सभागृहात सोमवार, दिनांक २५ सप्टेंबर २०२३ रोजी पार पडला. या कार्यक्रमात अध्यक्षीय भाषण करताना कुलगुरू डॉ. चौधरी बोलत होते.

पुरस्कार वितरण समारंभाच्या अध्यक्षस्थानी माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, अधिसभा सदस्य दिनेश शेराम, रासेयो संचालक डॉ. सोपानदेव पिसे यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना कुलगुरू डॉ. चौधरी यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वरूप प्रसंगानुसार तसेच गरजेनुसार बदलले पाहिजे, असे सांगितले. समाजपयोगी नवीन उपक्रम तयार करण्यासाठी वातावरण निर्मिती केली पाहिजे. कौशल्य विकास, शेती विषयक मार्गदर्शन, हस्तकला, उद्योजकता विकास आदीबाबत समाजामध्ये जागृती

निर्माण व्हावी, असे वातावरण तयार करण्याचे आवाहन कुलगुरू डॉ. चौधरी यांनी केले. तळागाळातील नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ मिळावा या दृष्टिकोनातून रासेयोने काम करावे. वैद्यकीय सुविधा कौटुंबिकदृष्ट्या समाजाला मिळाव्या म्हणून मदत करावी. गाव पातळी, महाविद्यालयीन स्तरावर या सर्व घटकांचा विस्तार करणे आवश्यक असल्याचे कुलगुरू म्हणाले. यावेळी सर्व पुरस्कार प्राप्त स्वयंसेवक, कार्यक्रम अधिकारी व प्राचार्यांचे कुलगुरूंन अभिनंदन केले. यावेळी प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांनी सर्व पुरस्कारकर्त्यांचे अभिनंदन केले.

प्रास्ताविक करताना रासेयो संचालक डॉ. सोपानदेव पिसे यांनी विद्यापीठाच्या शताब्दी वर्षाच्या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन केल्या जात असल्याचे सांगितले. जिल्हानिहाय वेगवेगळे कार्यक्रम रासेयोच्या वतीने राबविले जात आहे. देशाच्या स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव व रासेयोची बांधिलकी व महत्त्व याविषयी माहिती दिली. केंद्र व राज्य सरकारच्या विविध उपक्रमांची योजनांची अंमलबजावणी रासेयोच्या माध्यमातून होत असल्याचे सांगितले. रासेयो ही संघटना भविष्यकालीन दृष्टीने भारतासाठी अत्यावश्यक व भूषणावह असल्याचे डॉ. पिसे म्हणाले. यावेळी 'माझी माती माझा देश' अभियान अंतर्गत कलशमध्ये माती टाकत उपक्रमाचे महत्व वाढविले. सोहळ्याचे संचालन करीत आभार प्रकाश शुक्ला यांनी मानले.

### पुरस्कार देऊन सन्मान

विद्यापीठस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्यामध्ये स्वयंसेवक गटात नागपूर येथील शासकीय ज्ञान विज्ञान संस्थेचा मनीष कडूकर, नागपूर शंकर नगर येथील एलएडी कॉलेजची कु. कोमल नागरूकर, समर्थ महाविद्यालय लाखनी येथील चंद्रहास खंडारे, एनएमडी कॉलेज गोंदिया येथील निखिल बनसोड आदी स्वयंसेवकांचा कुलगुरूंच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रम अधिकारी श्रेणीमध्ये डॉ. एन. के. उमाठे कॉलेजचे डॉ. विनोद खेडकर, ताईगोलवलकर महाविद्यालयाचे डॉ. चंद्रमोहन सिंह, जे. एम. पटेल कॉलेज भंडारा येथील डॉ. भोजराज श्रीरामे, डी.बी. सायन्स कॉलेजचे डॉ. गुणवंत गाडेकर, न्यू आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेजचे डॉ. हेमंत मिसाळ आदी कार्यक्रम अधिकाऱ्यांचा कुलगुरूंच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी महाविद्यालय श्रेणीमध्ये डॉ. एन. के. उमाठे कॉलेज, ताईगोलवलकर महाविद्यालय, जे. एम. पटेल कॉलेज भंडारा, डी.बी. सायन्स कॉलेज व न्यू आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज आदी महाविद्यालयांच्या प्राचार्यांचा सत्कार करण्यात आला.

## महात्मा गांधी यांनी नई तालीमच्या रचनात्मक कार्यातून मांडली स्वातंत्र्योत्तर भारताची ब्ल्यू प्रिंट आरएफआरएफ नागपूरचे श्री भुजंग बोबडे यांचे प्रतिपादन







महात्मा गांधी यांनी नई तालीमच्या रचनात्मक कार्यातून स्वातंत्र्योत्तर भारताची ब्ल्यू प्रिंट मांडली, असे प्रतिपादन आरएफआरएफ नागपूरचे श्री भुजंग बोबडे यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात महात्मा गांधी विचारधारा विभागाच्या वतीने गांधी जयंती सप्ताह साजरा केला जात आहे. या सप्ताहाच्या प्रथम दिवशी सोमवार, दिनांक २५ सप्टेंबर २०२३ रोजी सायंकाळी आयोजित व्याख्यान सत्रात बोबडे मार्गदर्शन करीत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मानव विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी होते तर मंचावर श्री भुजंग बोबडे, अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू, महात्मा गांधी विचारधारा विभाग प्रमुख श्री. प्रमोद वाटकर उपस्थित होते.

'महात्मा गांधी यांच्या विचार परिपेक्ष्यातून स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर भारत' या विषयावर पुढे मार्गदर्शन करताना महात्मा गांधी यांचे विचार जाणून घेण्याची संपूर्ण जगात जिज्ञासा असून त्यांच्या विचाराप्रती आपण अज्ञानी राहून चालणार नाही, असे बोबडे म्हणाले. आपण विचारांनी गुलाम राहिलो तर जगातील कुठलीही शक्ती यापुढे आपणास स्वातंत्र्य करू शकणार नाही. महात्मा गांधी यांचे महत्त्व कालच्या पेक्षा

आज अधिक आहे. संयुक्त राष्ट्र संघाने शाश्वत विकासाच्या दृष्टीने संकल्पना मांडली आहे. मात्र, शाश्वत विकासाची संकल्पनेवर महात्मा गांधी यांनी त्यांच्या विचार- आचारातून आधीच प्रयोग केले असल्याचे बोबडे म्हणाले. मानव आणि निसर्गाचे संतुलन कसे साधावे याचे विचार महात्मा गांधी यांनी मांडले आहे. आध्यात्मिक, आर्थिक आधारावर सामाजिक जीवनात कसे टिकून राहायचे आणि निसर्गाशी समतोल साधून कसे टिकून राहू शकतो, याचे विचार महात्मा गांधींनी दिले आहे. गौतम बुद्धाची करुणा -अहिंसा जरी समजून घेतली तरी गांधी कळू शकतो, असे ते म्हणाले. यावेळी त्यांनी महात्मा गांधी यांनी नई तालीमच्या माध्यमातून शिक्षणामध्ये केलेल्या प्रयोगाबाबत माहिती दिली. भारताचे खरे स्वातंत्र्य किंवा संपूर्ण स्वराज्य याचा मार्ग नईतालीम शिक्षणाच्या माध्यमातून महात्मा गांधी यांनी सांगितला असल्याचे बोबडे म्हणाले.

महात्मा गांधी यांचे विचार व मूल्य त्यांनी केलेल्या सत्याच्या प्रयोगातून काळाच्या कसोटीवर सफल सिद्ध झाल्याचे अध्यक्षीय भाषण करताना मानव विज्ञान विद्या शाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांनी सांगितले. महात्मा गांधी 'गावाकडे चला' असे म्हणतात तेव्हा पर्यटनासाठी नव्हे तर गावाकडून शिकण्यासाठी, स्वातंत्र्य -स्वराज्य प्राप्तीसाठी चला असे त्यांचे म्हणणे आहे. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी अभ्यासक्रम शिकत असताना स्वकला, कौशल्य हीच त्यांची खरी ओळख असून त्याला विकसित करा, असे आवाहन त्यांनी केले. गांधी विचारधारा विभाग प्रमुख श्री. प्रमोद वाटकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे संचालन अरुण मानकर यांनी केले तर धम्मप्रकाश वैद्य यांनी आभार मानले. कार्यक्रमाला विभागातील विद्यार्थी शिक्षक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अध्ययनातून महात्मा गांधी समजून घेण्याची गरज

### - माजी मराठी विभाग प्रमुख डॉ. प्रमोद मुनघाटे यांचे प्रतिपादन

- राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात गांधी जयंती सप्ताह





वर्तमान काळात महात्मा गांधी अध्ययनातून समजून घेण्याची गरज असल्याचे प्रतिपादन माजी मराठी विभाग प्रमुख डॉ. प्रमोद मुनघाटे यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात महात्मा गांधी विचारधारा विभागाच्या वतीने गांधी जयंती सप्ताह साजरा केला जात आहे. या सप्ताहात मंगळवार, दिनांक २६ सप्टेंबर २०२३ रोजी आयोजित व्याख्यान सत्रात डॉ. मुनघाटे मार्गदर्शन करीत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आंतर विद्याशाखीय विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू होते तर मंचावर माजी मराठी विभाग प्रमुख डॉ. प्रमोद मुनघाटे, महात्मा गांधी विचारधारा विभाग प्रमुख श्री. प्रमोद वाटकर, डॉ. स्मिता नाहतकर उपस्थित होते.

'अहिंसात्मक जीवन पद्धती : वर्तमान काळातील आवश्यकता' या विषयावर पुढे बोलताना डॉ. प्रमोद मुनघाटे यांनी सत्य आणि अहिंसा हे दोनच शब्द महात्मा गांधी यांची ओळख सांगण्यास पुरेसे आहे, असे सांगितले. महात्मा गांधी यांनी नागपूर येथे १९२० मध्ये झालेल्या अधिवेशनानंतर महिला, शेतकरी, कष्टकरी, सर्वसामान्य नागरिकांना स्वातंत्र्य आंदोलनात सहकार व सत्याग्रह हे साधन वापरून सहभागी करून घेतले. सहकार व सत्याग्रह यामध्ये सहभागी होत सर्व सामान्य नागरिकांना देखील देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात आपला सहभाग आहे, असे वाटते. देशाचे स्वातंत्र्य श्रमिक, सर्वसामान्य जनतेच्या ताब्यात महात्मा गांधी यांच्या माध्यमातून जात आहे. यामुळेच काही विशिष्ट संघटनांच्या माध्यमातून महात्मा गांधींचा द्वेष करणे सुरू झाले आणि सातत्याने द्वेष करणे सुरू आहे. महात्मा गांधी यांच्याकडे मुळातून पाहण्याची गरज तसेच अध्ययनातून त्यांना जाणून घेण्याची गरज असल्याचे डॉ. मुनघाटे पुढे बोलताना म्हणाले.

महात्मा गांधी यांनी गौतम बुद्धाच्या करुणा व अहिंसेच्या विचाराचा सामुहिक प्रयोग भारतात अन्याय व शोषणाविरोधात लढताना केला. भगवद् गीतेतून विश्वरूप दर्शन व अद्वैतवाद म्हणजेच कणाकणात असलेल्या ईश्वराचा वास हे अहिंसा सिद्धांताचे महात्मा गांधी यांनी केलेले प्रयोग आहेत. महात्मा गांधी हे धार्मिक होते, हिंदू होते, मात्र त्यांच्या घरी -आश्रमात मंदिर किंवा मूर्ती नव्हती. महात्मा गांधी प्रार्थना करीत होते. मात्र, त्यांच्या




प्रार्थनेत सर्वधर्माच्या प्रार्थनांचा समावेश होता. आत्मिक शुद्धता देणारी त्यांची धर्माची संकल्पना होती. दुसऱ्या धर्माविरोधात द्वेष बाळगतो तो धार्मिक असूच शकत नाही. जगातील सर्व धर्म सारखेच आहे, अशी शिकवण महात्मा गांधी यांनी दिली आहे. महात्मा गांधी यांचे सर्व विचार अंमलात आणले तर अहिंसेबाबतची प्रासंगिकता लक्षात येते, असे डॉ. मुनघाटे पुढे बोलताना म्हणाले. अध्यक्षीय भाषण करताना अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू यांनी महात्मा गांधी यांच्या अहिंसा व सत्याग्रह या दोन शस्त्र विषयी माहिती दिली. जीवनातील तणाव, हिंसा आणि कमी होत असलेला स्नेहभाव यावर केवळ महात्मा गांधी यांचे विचार हेच एकमेव समाधान असल्याचे डॉ. कडू म्हणाले. स्वतःच स्वतःचा दीपस्तंभ व्हा, स्वतःला ओळखण्याची क्षमता निर्माण करा स्वतः प्रती प्रामाणिक राहा असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना गांधी विचारधारा विभागप्रमुख श्री प्रमोद वाटकर यांनी गांधी जयंती सप्ताह निमित्त आयोजित विविध कार्यक्रमांची माहिती दिली. कार्यक्रम स्थळी लावण्यात आलेल्या खादी स्टॉलला भेट देण्याचे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. स्मिता नाहतकर यांनी केले तर आभार डॉ. गणेश ढोबळे यांनी मानले. कार्यक्रमाला डॉ. एस. सी. गुल्हाने प्रेरणा महाविद्यालय, राजकुमार केवलरामानी महिला महाविद्यालय, उमाटे महाविद्यालय व विभागातील शिक्षक तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.







## पर्यटन क्षेत्र करू शकते देशाचा विकास

### प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे यांचे प्रतिपादन

### प्रवास व पर्यटन विभागात जागतिक पर्यटन दिवस उत्साहात

पर्यटन क्षेत्र देशाचा विकास करू शकते, असे प्रतिपादन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माननीय प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील प्रवास व पर्यटन विभागात जागतिक पर्यटन दिवस बुधवार, दिनांक २७ सप्टेंबर २०२३ रोजी उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून डॉ. दुधे मार्गदर्शन करीत होते. यावेळी विभाग प्रमुख डॉ. प्रियदर्शी खोब्रागडे उपस्थित होते.

भारत हा विपुल प्रमाणात तसेच वैविध्यपूर्ण नैसर्गिक संसाधनांनी नटलेला देश असल्याचे सांगत डॉ. दुधे पुढे म्हणाले की, तीन ऋतू भारताला मिळाले आहे. प्रत्येक राज्यामध्ये नैसर्गिक विविधता आहे. कुठे डोंगर, कोठे समुद्र तर कोठे वाळवंट असे सर्वच आपणाकडे आहे. सोबतच प्राचीन तसेच प्रगत भारतीय वास्तुशास्त्राची जगाला ओळख आहे. परंपरेने मिळालेल्या गोष्टींकडे आपण संधी म्हणून पाहिले नाही. त्याकडे संधी म्हणून पाहिले असते तर जगात आपण अव्वल दर्जावर असतो. येणाऱ्या काळामध्ये पर्यटन पहिल्या क्रमांकाचा व्यापार बनेल असे डॉ. दुधे म्हणाले. दुबई आणि सिंगापूर शहराने पर्यटन क्षेत्रामध्ये कसे भरीव काम करीत जगातील पर्यटकांना आकर्षित केले याची माहिती दिली. त्याचप्रमाणे आपण देखील पर्यटन उद्योगांमध्ये प्रगती का करू शकत नाही असे प्र-कुलगुरु डॉ. दुधे म्हणाले.

जीवनाचे अंतिम लक्ष्य समाधान हेच असल्याचे फलित साधू संतांनी सांगितले आहे. आनंद व समाधान मिळावे म्हणून आपण जीवनात प्रयत्न करतो. पर्यटनातून समाधान मिळते, आनंद मिळतो हे या विभागातील विद्यार्थ्यांनी लोकांना समजावून सांगावे लागणार आहे. तंत्रज्ञानामुळे वाचन कमी झाले. असे असले तरी प्रत्येक जण काही ना काही तरी करीत असतो. अशाच व्यक्तींकरिता प्रवास व पर्यटन क्षेत्र कार्यशीलता दाखविण्याचे क्षेत्र आहे. कमी भांडवलात चांगला व्यवसाय देणारे हे क्षेत्र असून या उद्योगांमध्ये मोठा पैसा असल्याचे ते म्हणाले. सोबतच विभागातील शिक्षक विद्यार्थ्यांनी नागपूर परिक्षेत्रातील तसेच विदर्भातील दुर्लक्षित असलेल्या पर्यटन स्थळांची माहिती गोळा करून त्याबाबत जनजागृती करावी असे आवाहन डॉ. दुधे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना विभाग प्रमुख डॉ. प्रियदर्शी खोब्रागडे यांनी नवीन शैक्षणिक धोरणानुसार विभागातील अभ्यासक्रमांमध्ये त्याचा समावेश करण्यात आल्याची माहिती दिली. पाहुण्यांचा परिचय अमन गुंजेवार यांनी करून दिले. संचालन खुशी कांबळे हिने केले तर आभार नरेश मेश्राम यांनी मानले. या कार्यक्रमात जयंत साठे लिखित पुरस्कार भेट देण्यात आली कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. अरविंद उपासनी, डॉ. अमरदीप बारसागळे, प्रा. शोभना मेश्राम, प्रा. मंजुषा डोंगरे, परिमल सुराडकर, भाग्यश्री हिरादेवे, प्रा.नेहा दुबे यांनी सहकार्य केले.



## विद्यापीठाच्या सिंथेटिक ट्रॅकने घडतील राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय खेळाडू
## नागपूरातील खेळाडू- प्रशिक्षकांनी व्यक्त केली भावना



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या क्रीडा संकुल परिसरातील सिंथेटिक ट्रॅकचे लोकार्पण रविवारी माननीय उपमुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. लोकार्पण झाल्याने सिंथेटिक ट्रॅक खेळाडूंना स्पर्धा तसेच सरावासाठी आता उपलब्ध होणार आहे. त्यामुळे शहरातील खेळाडू तसेच प्रशिक्षकांनी आनंद व्यक्त केला आहे.

### खेळाडू व प्रशिक्षक यांच्या प्रतिक्रिया

### सुविधा मिळाल्याने खेळाडू घडतील

खेळाकरिता योग्य सुविधा मिळत असल्याने यंदा १४ वर्षाखालील शाळकरी मुले देखील स्पर्धेकरिता आले आहेत. नागपूर शहरांमध्ये दोन सिंथेटिक ट्रॅक असल्याने खेळाडूंची संख्या वाढण्यास मदत होईल. दुसरी सिंथेटिक ट्रॅकची सुविधा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने उपलब्ध करून दिली आहे. या नवीन ट्रॅकवर गती तसेच मूलभूत सुविधा सर्वाधिक आहेत. सर्व साहित्य त्याचप्रमाणे प्रशिक्षक देखील उपलब्ध आहेत. त्यामुळे पालकांनी देखील त्यांच्या पाल्यांना खेळाकरिता प्रोत्साहन दिले पाहिजे.

**- श्री. रितेश आनंद, ४ बाय १०० रिले प्रकारात कॉमनवेल्थ गेम्स ब्रांझ मेडलिस्ट**

### आधुनिक सुविधा निर्माण केली

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा सिंथेटिक ट्रॅक महाराष्ट्र राज्यातील अव्वल दर्जाचा ट्रॅक ठरला आहे. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला विषय मार्गी लागल्याने खेळाडूंना सुविधा प्राप्त होणार आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाचा सिंथेटिक ट्रॅक निर्माण झाल्याने राष्ट्रीय -आंतरराष्ट्रीय अशा मोठ्या स्पर्धा आता नागपूरात घेणे शक्य होणार आहे. मोठ्या स्पर्धा होत नसल्याची उणीव विद्यापीठाच्या ट्रॅकने भरून काढली आहे. अशा प्रकारचा ट्रॅक नसल्याने विदर्भातील खेळाडू माघारत होते. मात्र, विद्यापीठाच्या मैदानावर सिंथेटिक ट्रॅक तयार झाल्याने खेळाडूंकडून प्रशिक्षकांच्या अपेक्षा वाढल्या आहे. स्टीपल चेस प्रकारच्या सुविधा देखील या ट्रॅकवर आहे. शहरात दुसरा ट्रॅक निर्माण केल्याने विद्यापीठाचे आभार मानावे तेवढे कमी आहे. - श्री. रवींद्र टोंग, राष्ट्रीय ॲथलेट तथा आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक

### एकाच ठिकाणी अनेक सुविधा

विद्यापीठाचा सिंथेटिक ट्रॅक शहराच्या मध्यभागी आहे. सोबतच सर्व सुविधायुक्त चांगल्या दर्जाचा सिंथेटिक ट्रॅक निर्माण झाला आहे. या सिंथेटिक ट्रॅकवर संपूर्ण व्यवस्थापन चांगल्या प्रकारे करण्यात आले आहे. खेळाडूंकरिता पिण्याच्या पाण्याची सुविधा त्याचप्रमाणे प्रसाधनाची सुविधा देखील योग्य प्रकारे करण्यात आली आहे. एकाच ठिकाणी खेळाडूंसाठी विविध चांगल्या सुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत. त्यामुळे भविष्यात चांगले खेळाडू घडतील.

**- नयन प्रदीप सरडे, ११० मी. हर्डल्स ज्यूनीअर सुवर्णपदक विजेता**

### आंतरराष्ट्रीय -राष्ट्रीय खेळाडू घडतील

विद्यापीठाच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय दर्जाचा सिंथेटिक ट्रॅक शहरात उपलब्ध झाला आहे. त्यामुळे शहरातून राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय धावपटू घडतील ही अपेक्षा आहे. अनेक प्रयत्नानंतर सिंथेटिक ट्रॅक निर्माण झाल्याने सर्वांचे अभिनंदन. या ट्रेकच्या मदतीने धावपटूंना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर जाण्यासाठी मदत मिळेल. प्रशिक्षक तसेच खेळाडू आधी सर्वांसाठी ही आनंदाची बाब आहे. मातीची धावपट्टी आणि सिंथेटिक ट्रॅकवर धावणे यामध्ये फार अंतर आहे. ही सुविधा पर्वणी ठरेल.

**- जितेंद्र घोरदडेकर, प्रशिक्षक नवमहाराष्ट्र क्रीडा मंडळ व क्रीडा शिक्षक पंडित बच्छराज व्यास विद्यालय**

### मध्यभागी असल्याने सुविधाजनक

विद्यापीठाचा सिंथेटिक ट्रॅक मध्यभागी असल्याने शहरातील खेळाडूंना एक चांगली सुविधा उपलब्ध होणार आहे. आंतरराष्ट्रीय दर्जाचा ट्रॅक असल्या huने अन्य शहरांमध्ये सरावा करिता न जाता नागपूर येथेच खेळाडू सराव करतील. आंतरराष्ट्रीय वर्ग २ चार दर्जा मिळाला असल्याने या ट्रॅकचा फायदा संपूर्ण खेळाडूंना होईल. शिवाय नागपूर परिक्षेत्रातून राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय खेळाडू घडतील.

**- गजानन ठाकरे, स्प्रिंटींग ॲण्ड जम्पिंग (NIS) प्रशिक्षक**






## माननीय कुलगुरूंनी केली मुद्रणालयाची पाहणी



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या महाराज बाग स्थित छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसरात असलेल्या मुद्रणालयाचे शुक्रवारी (२२ सप्टेंबर) रात्री झालेल्या जोरदार पावसाने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी सोमवार दिनांक २५ सप्टेंबर २०२३ रोजी मुद्रणालयाची पाहणी केली.

नागपूर शहरांमध्ये शुक्रवारी रात्री जोरदार पाऊस बरसला. महाराज बाग परिसरात असलेल्या विद्यापीठ मुद्रणालय विभागात मोठ्या प्रमाणात पाणी शिरले. मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाल्याने विद्यापीठाचे पेपर गोदामात तब्बल ८ फूट पाणी साचले होते. या नैसर्गिक आपत्तीमुळे विद्यापीठ मुद्रणालयात लाखो रुपयांचे नुकसान झाले. पाहणी केल्यानंतर संबंधित कारवाई करण्याचे निर्देश माननीय कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांनी प्रकाशन विभागाला दिले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. सोपानदेव पिसे, विद्यापीठ प्रकाशन अधिकारी श्री. प्रवीण गोतमारे, मुद्राणालय कर्मचारी पांडुरंग इंगळे व अन्य कर्मचारी उपस्थित होते.

# मनुष्याचे जीवन नम्रतेने झुकलेले असावे - डॉ. संजय दुधे
# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात सेवानिवृत्ती समारोह





जीवन हे फार सुंदर आहे. त्यामुळे मनुष्याने जीवनात नेहमी नम्रतेने झुकलेले असावे, असे प्रतिपादन माननीय प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात सेवानिवृत्ती समारोह शुक्रवार, दिनांक २९ सप्टेंबर २०२३ रोजी पार पडला. सत्कार कार्यक्रमात अध्यक्षीय स्थानावरून डॉ. संजय दुधे मार्गदर्शन करीत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे तर प्रमुख अतिथी म्हणून कुलसचिव डॉ. राजू हिवसे मंचावर उपस्थित होते. या कार्यक्रमामध्ये आस्थापना शाखेतील उपकुलसचिव श्री. वसीम अहमद मोहम्मद हुमायूँ अख्तर, उद्यान विभागातील उच्चश्रेणी लिपिक श्री. गणेश तुकडूजी शेंडे, सांख्यिकी विभागातील उच्च श्रेणी लिपिक श्री. सुनील कृष्णराव इंगळे व भौतिक शास्त्र विभागातील प्रयोगशाळा परिचर श्री. दिगंबर बारसू बहटि या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सपत्नीक सत्कार प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे व कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांच्या शुभहस्ते करण्यात आला. यावेळी पुढे मार्गदर्शन करताना डॉ. दुधे यांनी विद्यापीठाच्या वतीने करण्यात आलेला सत्कार स्वीकारलेल्या सत्कारमूर्तींचे अभिनंदन केले. नोकरीला लागलेला व्यक्ती सेवानिवृत्त होतोच. सेवानिवृत्त झाल्यानंतर पुढील आयुष्य आनंदमयी जावो अशा शुभेच्छा देखील त्यांनी दिल्या. एखाद्या संस्थेत कार्य करीत असताना 'मी काय मिळविले आणि लोकांना काय दिले' याचा लेखाजोखा सेवानिवृत्तीनंतर समाधानाच्या रूपामध्ये मिळत असतो. मेहनतीने काम केले त्या व्यक्तीचे कोणीही नाव घेते. व्यक्ती त्याच्या कार्यामुळेच परिचित होत असल्याचे डॉ. दुधे म्हणाले. काम करतो तेथे विश्वास लागतो. त्यामुळे विश्वासार्हता ही महत्त्वपूर्ण आहे. विश्वास आणि मेहनतीने जो काम करतो तो यशस्वी होतो, असे डॉ. दुधे म्हणाले.

सेवानिवृत्ती निमित्य करण्यात आलेल्या सत्काराला उत्तर देताना श्री. वसीम अहमद यांनी विद्यापीठात नोकरी स्वीकारल्यापासून ते सेवानिवृत्ती पर्यंत आलेले अनुभव विषद केले. संस्कृत विभाग, इंग्रजी विभाग, तक्रार निवारण कक्ष, कुलसचिव कार्यालय, समाजशास्त्र विभाग, परीक्षा विभाग, त्याचप्रमाणे दोन वेळा कुलगुरू शोध समितीवर कार्य केल्याची माहिती त्यांनी दिली. शताब्दी महोत्सवी वर्ष दरम्यान सुवर्णपदक देत गौरव केल्याने त्यांनी विद्यापीठाचे आभार मानले. यावेळी कर्मचाऱ्यांच्या वतीने आस्थापना विभागातील श्री. प्रवीण मंगरूळकर यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन दीपक घोडमारे यांनी केले तर आभार कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी मानले. कार्यक्रमाला लक्ष्मीनारायण अभिनव तंत्रज्ञान विद्यापीठाचे संचालक डॉ. राजू मानकर, वित्त व लेखा अधिकारी श्री. हरीश पालीवाल यांच्यासह अधिष्ठाता, विविध विभागांचे विभाग प्रमुख, शिक्षक, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.







# शेवटच्या घटकाचा विकास हेच डी. लक्ष्मीनारायण यांचे विचार

## - डॉ. संजय दुधे

## -राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात रावबहादुर डी. लक्ष्मीनारायण दिवस कार्यक्रम

समाजातील शेवटच्या घटकाचा विकास व्हावा हेच रावबहादूर डी. लक्ष्मीनारायण यांचे विचार होते, असे प्रतिपादन माननीय प्र-कलगुरू डॉ. संजय दुधे यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील जमनालाल बजाज प्रशासकीय भवनाच्या सभागृहात शनिवार, दिनांक ३० सप्टेंबर २०२३ रोजी रावबहादुर डी. लक्ष्मीनारायण दिवस कार्यक्रम पार पडला. यावेळी डॉ. दुधे मार्गदर्शन करीत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माननीय प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे होते तर प्रमुख अतिथी म्हणून कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे मार्गदर्शन करताना डॉ. दुधे यांनी रावबहादूर डी. लक्ष्मीनारायण यांच्याबाबत माहिती देताना त्यांनी त्यांची जमीन विद्यापीठाला दान दिल्याचे सांगितले. लोकांकरिता नवनवीन तंत्रज्ञान निर्माण करून देश विकासात हातभार लागावा, असे विचार करणारे काही लोक होते. त्याच महामानवांमध्ये रावबहादुर डी. लक्ष्मीनारायण यांचा समावेश आहे. शिक्षण घेतले पाहिजे असे कोणालाही वाटत नव्हते, त्याकाळी रावबहादुर डी. लक्ष्मीनारायण यांनी तंत्रसंस्था उभारण्यासाठी मोलाची मदत केली. तत्कालीन काळामध्ये सेवाभाव महत्त्वाचा मानला जात होता. अशाच काळात रावबहादूर डी. लक्ष्मीनारायण यांनी त्यांची संपत्ती जनतेच्या स्वाधीन केली. आपणासोबतच दुसऱ्यांचा विकास करण्याचा प्रयत्न व्हावा म्हणून या महामानवांनी लोकांकरीता शैक्षणिक दालन खुले केले. आज शैक्षणिक क्षेत्रामध्ये कार्य करणाऱ्या शिक्षकांनी देखील समाजाच्या विकासासाठी काय करता येईल, याकडे लक्ष देण्याची गरज आहे. त्याकरिता डी. लक्ष्मीनारायण यांच्यासारखी समाजसेवेची प्रवृत्ती पाहिजे, असे डॉ. दुधे म्हणाले. रावबहादूर डी. लक्ष्मीनारायण यांनी दिलेल्या जमिनीवर विद्यापीठ तसेच लक्ष्मीनारायण तंत्रसंस्था उभी राहिल्याचे ते म्हणाले. तत्पूर्वी विद्यापीठाच्या वतीने माननीय प्र- कुलगुरू डॉ. संजय दुधे व कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांनी रावबहादूर डी. लक्ष्मीनारायण यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करीत अभिवादन केले. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ. प्रफुल्ल साबळे, वित्त व लेखा अधिकारी श्री. हरीश पालीवाल, अधिष्ठाता डॉ. प्रशांत माहेश्वरी, अधिष्ठाता डॉ. संजय कवीश्वर, अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू, अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांच्यासह संचालक, विविध विभाग प्रमुख, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

देशोन्नती

# 'माझी माती माझा देश' अभियानाला बनवू लोकचळवळ

- रासेयो राज्य सल्लागार समिती सदस्य डॉ. राजेश पांडे यांचे आवाहन
- विद्यापीठात अमृतकलश संकलन नियोजन कार्यशाळा



**नागपूर** ■ भारत भूमीच्या स्वातंत्र्यासाठी असंख्य शहिदांनी बलिदान दिले. त्या शहिदांना वंदन करणे तसेच भूमीला नमन करण्यासाठी सरकारने 'माझी माती माझा देश' अभियान सुरू केले आहे. या 'माझी माती माझा देश' अभियानाला लोकचळवळ बनवू या, असे आवाहन राष्ट्रीय सेवा योजनेचे राज्य सल्लागार समिती सदस्य डॉ. राजेश पांडे यांनी केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसरातील दीक्षांत सभागृहात राष्ट्रीय सेवा योजना, उच्च व तंत्रशिक्षण विभाग मंत्रालय कक्ष मुंबई, रासेयो कार्यक्रम अधिकारी व कलश संकलन नियोजन कार्यशाळा बुधवारी पार पडली. यावेळी डॉ. पांडे मार्गदर्शन करीत होते.

यावेळी व्यासपीठावर रासेयो राज्य सल्लागार समिती सदस्य डॉ. सतीश चाफले, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे माजी रासेयो संचालक डॉ. संजय चाकणे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे व्यवस्थापन आंबेडकर विधि महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. रवि मोर उपस्थित होते.

डॉ. राजेश पांडे म्हणाले की, देशाच्या स्वातंत्र्यासाठी अनेकांनी प्राणाची आहुती दिली, ज्या मातीसाठी बलिदान दिले. त्या मातीचे ऋण फेडण्यासाठी केंद्र सरकार संपूर्ण देशात 'माझी माती माझा देश' अभियान राबवित आहे. देशातील प्रत्येक नागरिकांमध्ये देशभक्ती जागविण्यासाठी हा उपक्रम राबविला जात आहे. अधिसभा सदस्य शुभांगी नक्षीने यांनी डॉ. राजेश पांडे यांचा परिचय करून

नवराष्ट्र

# विद्यापीठाच्या सिंथेटिक ट्रॅकचे लोकार्पण

**नागपूर.** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या क्रीडा संकुल मैदानावर साकारण्यात आलेल्या अद्ययावत सिंथेटिक ट्रॅकचे लोकार्पण रविवारी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. कुलगुरू चौधरी, प्र-कुलगुरु दुधे, कुलसचिव हिवसे, क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाचे संचालक सूर्यवंशी उपस्थित होते.

विद्यापीठाच्या हा सिंथेटिक ट्रॅक आंतरराष्ट्रीय दर्जाचा असून ट्रॅकवर 400 मीटरच्या एकूण 8 लेन आहेत. ट्रॅकवर पूर्व दिशेला गोळा फेक आणि भालाफेक तर पश्चिम दिशेला हातोडा फेक स्पर्धेसाठी विशेष व्यवस्था करण्यात आली आहे. दक्षिणेला 2 ठिकाणी लांब उडी व तिहेरी उडीसाठी जम्पिंग पीटची सुविधा आहे. ट्रॅकवर स्टिपल चेस प्रकारासाठी विशेष सुविधा आहे. ट्रॅक खराब होण्यापासून रोखण्यासाठी ड्रेनेज सिस्टीम व्यवस्था आहे. स्पर्धेपूर्वी सरावासाठी मैदानाच्या पूर्व व पश्चिम दिशेला विशेष व्यवस्था करण्यात आली आहे.



Orange City Plus
18 September 2023 P
epaper.navarasht

हॅलो नागपूर.

पर्व मांग



गणेश आराधना करताना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे आणि त्यांच्या सौभाग्यवती कविता दुधे.

# विद्यापीठाच्या सिंथेटिक ट्रॅकचे थाटात लोकार्पण

**नागपूर, ता. १७ :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या क्रीडा संकुलातील मैदानावर बांधण्यात आलेल्या ...ा अद्ययावत ...चे उपमुख्यमंत्री ...ा हस्ते रविवारी ...यात आले. ...पीठाचे कुलगुरू ... प्र-कुलगुरु डॉ. ...चिव डॉ. राजू ...बांधकाम तांत्रिक ...नंजय वेळूकर, ... माहेश्वरी, डॉ. ... प्रशांत कडू, ...गाचे संचालक ... आदी उपस्थित ...टनप्रसंगी रिले ...यात आले होते. ...गी झाले होते.



रविनगर चौक : सिंथेटिक ट्रॅकचे लोकार्पण करताना राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस. बाजूला कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी व इतर.

या आठ संघांना पीटी उषा, मिल्खा सिंग, नीरज चोप्रा, अंजू बॉबी जॉर्ज, रचिता मिस्त्री, राजीव बालकृष्णन, अविनाश साबळे आणि डॉ. आदिल सुमारीवाला या देशातील आजी-माजी ॲथलिट्सची नावे देण्यात आली होती. यावेळी उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते ट्रॅकच्या बांधकामात योगदान देणारे डॉ. धनंजय वेळूकर, कार्यकारी अभियंता अल्पना पाटणे, वर्षा घुशे, उपविभागीय अभियंता अतुल गोटे, सहाय्यक अभियंता (श्रेणी २) प्रवीण मोरे, कनिष्ठ अभियंता आकाश पगारे, मुंबई स्पोर्ट्स फॅसिलिटीचे धर्मेश घिया, अर्जुन यादव, अपेक्षा घिया, मुकुंद घिया यांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. उपमुख्यमंत्र्यांचाही सत्कार करण्यात आला. संचालन प्राचार्य डॉ. सोनाली सूर्यवंशी यांनी केले. तर आभार डॉ. शरद सूर्यवंशी यांनी आभार मानले. कार्यक्रमाला ज्येष्ठ ॲथलेटिक्स प्रशिक्षक भाऊ काणे, डॉ. विजय दातारकर, डॉ. संजय चौधरी, डॉ. यशवंत पाटील, डॉ. विवेक अवसरे, जिल्हा ॲथलेटिक्स संघटनेचे अध्यक्ष गुरुदेव नगराळे, सभापती उमेश नायडू, रामचंद्र वाणी, अर्चना कोट्टेवार, शेखर सुर्यवंशी, डॉ. विवेकानंद सिंग, प्रशिक्षक रवींद्र टोंग, जितेंद्र घोरदडेकर आदी उपस्थित होते.

तरुण भारत
Nagpur Main | 2023-09-22 | Page- 11
epaper.tarunbharat.net

तरुण
Apla Nagpur | 2(
epaper.tar

# रिले स्पर्धेत रुचिता

- विद्यापीठाच्या अद्ययावत सिंथेटिक ट्रॅकचे लोकार्पण
- उपमुख्यमंत्री फडणवीस यांची उपस्थिती

**नागपूर, १७ सप्टेंबर**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या क्रीडा संकुलात अत्याधुनिक सुविधांनी युक्त सिंथेटिक ट्रॅकचे लोकार्पण शनिवारी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी रिले शर्यतीचे आयोजन करण्यात आले. आजी-माजी ॲथलिट्सची नावे दिलेल्या रिले संघाचा यात समावेश होता. यात रुचिता मिस्त्री संघाने अव्वल स्थान प्राप्त केले.

रविनगरातील विद्यापीठाच्या सिंथेटिक ट्रॅकच्या लोकार्पणप्रसंगी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विशेष उपस्थिती होती. प्रमुख ...तिथी म्हणून रातुम नागपूर ...ापीठाचे कुलगुरू डॉ. सुभाष ...री, प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे, ...चिव डॉ. राजू हिवसे उपस्थित ... याप्रसंगी नागपूर विद्यापीठ ...विभागाचे संचालक डॉ. शरद ... डॉ. धनंजय वेळूकर, ... विभागाच्या डॉ. माधवी ... डॉ. विशाखा जोशी, संजय ...ार्य पुरस्कार प्राप्त विजय ...ज्येष्ठ प्रशिक्षक भाऊ ... प्रशांत कवीश्वर, डॉ. ... योगपटू धनश्री ... उपस्थित होते. ...ीत पी. टी. उषा, ...ज चोप्रा, अंजूबॉबी ...लकृष्णन, रुचिता ... साबळे, डॉ. ...ा अशा आठ संघांनी सहभाग नोंदविला होता. यात ४ बाय १०० मीटर रिले स्पर्धेत ४९.७५ एवढी वेळ नोंदवीत रुचिता मिस्त्री संघाने सुवर्णपदक प्राप्त केले. विजयी संघात आर्यन पांडे, सान्वी पाठक, व्ही. नागेश्वरी, विभास जाधव यांचा समावेश होता. रौप्यपदक ५०.५८ एवढ्या वेळेसह पी. टी. उषा संघाने मिळविले. या संघात ऋषिकेश लोंदे, समीक्षा बागडे, अनुष्का बोदिले, ओम इटकेलवार यांचा समावेश होता. हर्ष सिंग, भव्यश्री महल्ले, साक्षी तंबाखे, चिराग लहबार यांचा समावेश असलेल्या मिल्खा सिंग संघाने ५१.०९ एवढी वेळ नोंदवीत कांस्यपदक प्राप्त केले. यावेळी ५० मीटर धावण्याच्या शर्यतीचे आयोजन देखील करण्यात आले. तत्पूर्वी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते गन फायरने स्पर्धेची सुरुवात करण्यात आली. विजयी संघांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पदके देऊन सन्मानित करण्यात आले.

याप्रसंगी सिंथेटिक ट्रॅक बांधकाम तांत्रिक समिती सदस्य, सार्वजनिक बांधकाम विभाग अभियंता, मुंबई स्पोर्ट्स फॅसिलिटीचे धर्मित घिया, तसेच इतर अभियंत्यांचा स्मृतिचिन्ह देऊन उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन प्राचार्य डॉ. सोनाली सूर्यवंशी यांनी, तर आभार क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळ संचालक डॉ. शरद सूर्यवंशी यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी जिल्हा ॲथ्लेटिक्स संघटनेचे अध्यक्ष गुरुदेव नगराळे, सभापती उमेश नायडू, वरिष्ठ सहसचिवद्वय रामचंद्र वाणी, अर्चना कोट्टेवार, शेखर सूर्यवंशी, डॉ. विवेकानंद सिंग, प्रशिक्षक रवींद्र टोंग, जितेंद्र घोरदडेकर, डॉ. संजय चौधरी, गणेश वाणी, सूरज सूर्यवंशी आदींनी प्रयत्न केले.

(तभा वृत्तसेवा)



धावण्याच्या स्पर्धेची गन फायरने सुरुवात करताना देवेंद्र फडणवीस, डॉ. सुभाष चौधरी, डॉ. संजय दुधे, डॉ. शरद सूर्यवंशी व इतर मान्यवर

city भास्कर

दैनिक भास्कर bhaskarhindi.com नागपुर . गुरुवार, 21 सितंबर 2023 17

राष्ट्रीय संगोष्ठी में रखे विचार-इसमें भारत के समग्र विकास की संकल्पना निहित

# नई सदी के भारत की आवश्यकता है राष्ट्रीय शिक्षा नीति : प्रो. दीक्षित

सिटी भास्कर | नागपुर

राष्ट्रीय शिक्षा नीति बदलते भारत की आवश्यकता है। इस नीति में भारत के समग्र विकास की संकल्पना निहित है। नई शिक्षा नीति में भारतीय भाषाओं और भारतीय ज्ञान परंपरा को आधार बनाने पर बल दिया गया है। यह बात प्रख्यात साहित्यकार प्रो. सूर्य प्रसाद दीक्षित ने कही। वे महाराष्ट्र राज्य हिन्दी साहित्य अकादमी, मुंबई के सहयोग से हिन्दी विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपुर विश्वविद्यालय द्वारा शिक्षा, संस्कृति उत्थान न्यास, नई दिल्ली एवं महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणे विदर्भ-प्रांत के संयुक्त तत्वावधान में आयोजित दो दिवसीय राष्ट्रीय संगोष्ठी के उद्घाटन सत्र को संबोधित कर रहे थे। संगोष्ठी का विषय था-'राष्ट्रीय शिक्षा नीति और भारतीय भाषाएं।' उन्होंने कहा कि भारतीय भाषाओं को शिक्षा का आधार बनाने से ज्ञान-विज्ञान के सभी अनुशासनों में बेहतर परिणाम मिलेंगे।



## विचारकों के अभिमतों का संकलन



इस अवसर पर राष्ट्रीय शिक्षा नीति में किए गए भाषा संबंधी प्रावधानों और उन पर देश के विचारकों के अभिमतों का संकलन 'राष्ट्रीय शिक्षा नीतिः अभिमत और प्रावधान' तथा हिन्दी विभाग द्वारा प्रकाशित त्रैमासिक पत्रिका 'विद्यार्थी दृष्टि' का विमोचन किया गया। कार्यक्रम के समन्वयक अकादमी के सदस्य जगदीश प्रसाद थपलियाल ने धन्यवाद ज्ञापित किया और संचालन डॉ. संतोष गिरहे ने किया। इस अवसर डॉ कृष्ण नागपाल, नरेंद्र परिहार, कृष्ण कुमार द्विवेदी, डॉक्टर सपना तिवारी, सुषमा नरांजे, संतोष बादल, अविनाश बागडे, अनिल मालोकर, देवयानी बनर्जी, एसपी सिंह सहित अनेक गणमान्य नागरिक और विद्यार्थी उपस्थित थे।

**भारत विविधताओं से भरा राष्ट्र :** कार्यक्रम की अध्यक्षता करते हुए विश्वविद्यालय के प्र- कुलगुरु डॉ. संजय दुधे ने कहा कि नागपुर विश्वविद्यालय ने नई शिक्षा नीति भारत की महान विरासत से विद्यार्थियों को परिचित कराएगी। भारत विविधताओं से भरा राष्ट्र है। अपने देश में भाषा, भूषा, साहित्य, रंग आदि सबमें विविधता है। इसके बावजूद हम एक हैं। एक साथ रहते हैं यह हमारी विशेषता है क्योंकि हमारी ज्ञान परम्परा ने हमें एकात्मता का सूत्र दिया है।

**चहुंमुखी विकास का सपना :** प्रमुख अतिथि महाराष्ट्र राज्य हिन्दी साहित्य अकादमी, मुंबई के कार्याध्यक्ष डॉ. शीतला प्रसाद दुबे ने अपने उद्बोधन में राष्ट्रीय शिक्षा नीति के कार्यान्वयन में आने वाली चुनौतियों को रेखांकित करते हुए कहा कि भारतीय भाषाओं के माध्यम से उन चुनौतियों से बेहतर तरीके से निपटा जा सकता है। हमारी भाषाओं को शिक्षा का माध्यम बनाने से देश का सामान्य व्यक्ति भी शिक्षा के प्रति जागरूक होगा। मध्य प्रदेश लोक सेवा आयोग की पूर्व सदस्य श्रीमती शोभा ताई पैठणकर ने विशिष्ट अतिथि के रूप में बोलते हुए कहा कि नई राष्ट्रीय शिक्षा नीति भारत के चहुंमुखी विकास का सपना है। इस अवसर पर अकादमी के सदस्य अजय पाठक ने राष्ट्रीय शिक्षा नीति की वर्तमान आवश्यकता पर प्रकाश डाला। महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा पुणे विदर्भ प्रांत के अध्यक्ष अजय पाटिल ने कहा कि यह चर्चा राष्ट्र के विकास के लिए बहुत जरूरी है। प्रास्ताविक रखते हुए हिंदी विभागाध्यक्ष डॉ मनोज पांडे ने कहा कि राष्ट्रीय शिक्षा नीति भारतीय ज्ञान परंपरा, महात्मा गांधी के सर्व समावेशी सिद्धांत, डॉ आंबेडकर के न्याय सिद्धांत और आत्मनिर्भर भारत के सपने को साकार करने की दृष्टि से प्रस्तुत एक ऐसा मॉडल है जिससे भारतीय शिक्षा व्यवस्था में बुनियादी परिवर्तन की अपेक्षा है।

Thu, 21 September 2023
https://epaper.bhaskarhindi.com/c/73494842



'विद्यार्थी दृष्टी'चे प्रकाशन करताना डॉ. संजय दुधे, प्रा. सूर्यप्रसाद दीक्षित, अजय पाटील व मान्यवर

# सर्वांगीण विकासाची संकल्पना नव्या शैक्षणिक धोरणात

**प्रा. सूर्यप्रसाद दीक्षित यांचे प्रतिपादन**

...क्षणिक ...राष्ट्रीय चर्चासत्र

...१ सप्टेंबर ... बदलत्या राष्ट्रीय ...ाची गरज आहे. ...र्वांगीण विकासाची ...धोरणात अंतर्भूत आहे. ...क धोरणात भारतीय ...भारतीय ज्ञानपरंपरेला ...त आले आहे, असे ...सूर्यप्रसाद दीक्षित यांनी ... तुकडोजी महाराज ...पीठ हिंदी विभाग, ...न्य हिंदी साहित्य ...क्षण, संस्कृती उत्थान ...त्तीच्या संयुक्त वतीने ... राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्घाटन झाले. प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे अध्यक्षस्थानी होते.

'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण आणि भारतीय भाषा' हा चर्चासत्राचा विषय होता. प्रा. दीक्षित म्हणाले की, भारतीय भाषांना शिक्षणाचा आधार बनवल्यास ज्ञान आणि विज्ञानाच्या सर्व शाखांमध्ये चांगले परिणाम मिळतील. प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे म्हणाले की, नवीन शैक्षणिक धोरणामुळे विद्यार्थ्यांना भारताच्या महान वारशाची ओळख होईल. हिंदी साहित्य अकादमीचे कार्याध्यक्ष डॉ. शीतला प्रसाद दुबे यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीतील आव्हाने अधोरेखित केली. त्या आव्हानांना भारतीय भाषांच्या माध्यमातून अधिक चांगल्या पद्धतीने सामोरे जाता येईल, असे सांगितले. हिंदी विभाग प्रमुख डॉ. मनोज पांडे म्हणाले की, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे भारतीय ज्ञानपरंपरा, महात्मा गांधींचे सर्वसमावेशक तत्त्व, डॉ. आंबेडकरांचे न्याय तत्त्व आणि स्वतःचे स्वप्न यांचा विचार करून मांडलेले मॉडेल आहे.

मध्यप्रदेश लोकसेवा आयोगाच्या माजी सदस्या शोभा पैठणकर, अकादमीचे सदस्य अजय पाठक, महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा पुणे विदर्भ प्रांत अध्यक्ष अजय पाटील यांनीही चर्चासत्रात सहभाग घेतला.

'विद्यार्थी दृष्टी' या त्रैमासिकाचे प्रकाशन करण्यात आले. संचालन डॉ. संतोष गिन्हे, आभारप्रदर्शन जगदीश प्रसाद थापलियाल यांनी केले. डॉ. कृष्णा नागपाल, नरेंद्र परिहार, कृष्णकुमार द्विवेदी, डॉ. सपना तिवारी, सुषमा नरंजे, संतोष बादल, अविनाश बागडे, अनिल मालोकर, देवयानी बॅनर्जी, एस. पी. सिंह यांच्यासह अनेक नागरिक व विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.

(तभा वृत्तसेवा)

Powered by iDocuments

नवराष्ट्र

# विद्यापीठात महात्मा गांधींच्या विचारांचा जागर

## जयंती सप्ताह आजपासून

**नागपूर.** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातर्फे महात्मा गांधी जयंतीनिमित्त त्यांच्या विचारांचा जागर केला जाणार आहे. याअंतर्गत महात्मा गांधी विचारधारा विभागात 25 सप्टेंबर ते 2 ऑक्टोबर दरम्यान गांधी जयंती सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून विविध कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे. सोमवारी 25 सप्टेंबर ला दुपारी 3 वाजता 'गांधी विचारांच्या अनुषंगाने स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर भारत' विषयावर व्याख्यान होणार असून आरएफआरएफचे भुजंग बोबडे मार्गदर्शन करतील. मानव विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता शामराव कोरेटी अध्यक्षस्थानी राहतील. मंगळवारी दुपारी 3 वाजता 'वर्तमान काळात अहिंसात्मक जीवन पद्धतीची प्रासंगिकता' या विषयावर माजी मराठी विभाग प्रमुख प्रमोद मुनघाटे यांचे व्याख्यान होईल. बुधवारी दुपारी 3 वाजता 'भारतीय आंदोलनांचा गांधी युग' विषयावर महात्मा गांधी हिंदी विद्यापीठ वर्धा येथील मिश्रा मार्गदर्शन करतील. शुक्रवारी चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी 11 ते दुपारी 12.30 दरम्यान इयत्ता 7 ते 8 वी व दुपारी 2 पासून वर्ग 9 ते 10 वी या दोन गटात स्पर्धा होईल. महात्मा माझ्या स्वप्नातील भारत, स्वच्छ भारत समृद्ध गांधीजींचे रेखाचित्र, ...ंदोलनातील भारत, भारतीय स्वातंत्र्य ... एक दृश्य हे चित्रकला ... आहेत. शनिवारीवर्ग 1... विद्यार्थ्यांची सकाळी 11 ... स्पर्धा होईल. रविवारी स... सामान्य ज्ञान परीक्षा होई... स. 10 वाजता गांधी ... आयोजन करण्यात ... चित्र प्रदर्शन, ग्रंथ ... प्रदर्शन, पुरस्कार वि... कार्यक्रम होणार आ...

Orange City Plus Edition
25 September 2023 Page No. 2
epaper.navarashtra.com

# विद्यापीठात आजपासून गांधी सप्ताह

**म.टा. प्रतिनिधी, नागपूर**



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात महात्मा गांधी जयंती सप्ताह सोमवार, २५ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान साजरा केला जाणार आहे. महात्मा गांधी विचारधारा विभागाच्यावतीने या काळात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

'गांधी विचारांच्या परिप्रेक्ष्यातून स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर भारत' या विषयावर सोमवारी दुपारी ३ वाजता विशेष व्याख्यानाचे आयोजन केले आहे. आरएफआरएफचे भुजंग बोबडे मार्गदर्शन करतील. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मानवविज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शाम कोरेटी राहतील. २६ सप्टेंबर ला 'वर्तमान काळात अहिंसात्मक जीवन पद्धतीची प्रासंगिकता' या विषयावर विद्यापीठाचे माजी मराठी विभाग प्रमुख डॉ. प्रमोद मुनघाटे हे व्याख्यान देतील. अध्यक्षस्थानी प्रेरणा कॉलेज नागपूरचे डॉ. प्रवीण जोशी राहतील. २७ सप्टेंबरला 'भारतीय आंदोलनांचे गांधीयुग' या विषयावर महात्मा गांधी हिंदी विद्यापीठ वर्धा येथील डॉ. मिश्रा मार्गदर्शन करतील. अध्यक्षस्थानी वर्धा येथील डॉ. नृपेंद्रप्रसाद मोदी राहतील.

२९ सप्टेंबर रोजी चित्रकला स्पर्धेचे आयोजन केले आहे. ३० सप्टेंबर रोजी वर्ग ११ ते १२ विद्यार्थ्यांसाठी सकाळी ११ वाजता व्याख्यान स्पर्धेचे आयोजन केले आहे. १ ऑक्टोबर २०२३ रोजी विद्यार्थ्यांसाठी सकाळी ११ वाजता पदवीधर विद्यार्थ्यांसाठी सामान्य ज्ञान परीक्षेचे आयोजन केले आहे. २ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता गांधी जयंती कार्यक्रम होईल. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी राहणार असून प्रमुख अतिथी म्हणून प्रकुलगुरु डॉ. संजय दुधे व कुलसचिव डॉ. राजू हिवसे यांची उपस्थिती राहणार आहे. या कार्यक्रमांना उपस्थित राहण्याचे आवाहन महात्मा गांधी विचारधारा विभाग प्रमुख डॉ. प्रमोद वाटकर यांनी केले आहे.

# रासेयो का राष्ट्रीय विकास में महत्वपूर्ण योगदान है : कुलगुरु डॉ. चौधरी



**नागपुर.** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपुर विश्वविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना के पुरस्कार वितरण समारोह में कुलगुरु डॉ. सुभाष चौधरी ने कहा की, राष्ट्रीय सेवा योजना का राष्ट्र की विकास में महत्वपूर्ण योगदान रहा है। सोमवार को महाराज बाग स्थित छत्रपति शिवाजी महाराज प्रशासनिक परिसर के दीक्षांत सभागृह में यह पुरस्कार वितरण समारोह आयोजित किया गया। बतौर अध्यक्ष वे बोल रहे थे। मुख्य अतिथि के रूप में प्र-कुलगुरु डॉ. संजय दुधे, अधिसभा सदस्य दिनेश शेराम, रासेयो संचालक डॉ. सोपानदेव पिसे उपस्थित थे। प्रास्ताविक डॉ. सोपानदेव पिसे ने किया। संचालन प्रकाश शुक्ला ने किया।

**इनको पुरस्कार से सम्मानित किया गया :** समारोह में स्वयंसेवक समूह में शासकीय ज्ञान विज्ञान संस्थान, नागपुर के मनीष कडुकर, शंकर नगर एलएडी कॉलेज के कोमल नागरकर, समर्थ कॉलेज लाखनी के चंद्रहास खंडारे, एनएमडी कॉलेज गोंदिया के निखिल बंसोड को कुलगुरु के हाथों सम्मानित किया गया। कार्यक्रम अधिकारी श्रेणी में डॉ. एल. के. उमाठे कॉलेज के डॉ. विनोद खेडकर, ताई गोलवलकर कॉलेज के डॉ. चंद्रमोहन सिंह, जे. एम. पटेल कॉलेज भंडारा के डॉ. भोजराज श्रीरामे, डी. बी. साइन्स कॉलेज के डॉ. गुणवंत गाडेकर, न्यू आर्ट्स कॉमर्स एंड साइंस कॉलेज के डॉ. हेमंत मिसाल तो कॉलेज श्रेणी में डॉ. एल. के. उमाठे कॉलेज, ताई गोलवलकर कॉलेज, जे. एम. पटेल कॉलेज भंडारा, डी. बी. साइन्स कॉलेज और न्यू आर्ट्स कॉमर्स एंड साइंस कॉलेज के प्राचार्यों का सम्मान किया गया।

## अवतीभवती



नागपूर : डॉ. सिंग यांचा सत्कार करताना डॉ. शरद सूर्यवंशी व इतर.

### विद्यापीठाच्या क्रीडा विभागातर्फे डॉ. सी. पी. सिंग यांचा सत्कार

नागपूर : इंडियन फ्लोअरबॉल फेडरेशन व फ्लोअरबॉल असोसिएशन ऑफ महाराष्ट्रतर्फे नागपूर विद्यापीठाच्या सहकार्याने आयोजित १७ व्या राष्ट्रीय फ्लोअरबॉल स्पर्धेदरम्यान लक्ष्मीबाई नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फिजिकल एज्युकेशन ग्वाल्हेर विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. सिंग यांचा सत्कार करण्यात आला. स्पर्धेच्या निमित्ताने नागपुरात आले असता डॉ. सिंग यांनी नागपूर विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण विभागाला भेट दिली. यावेळी आयोजित छोटेखानी कार्यक्रमात विद्यापीठाच्या क्रीडा विभागातर्फे संचालक डॉ. सूर्यवंशी यांनी त्यांना शाल व श्रीफळ देऊन त्यांना सन्मानित केले. शिक्षण क्षेत्रात तब्बल ३५ वर्षांचा अनुभव असलेले डॉ. सिंग हे नागपूर विद्यापीठाचे माजी ॲथलिट्स होते. त्यांनी ॲथलेटिक्स स्पर्धेत नागपूर विद्यापीठाचे प्रतिनिधित्वही केले. डॉ. सिंग यांनी विद्यापीठाच्या क्रीडा सुविधा बघून समाधान व्यक्त केले. याप्रसंगी नागपूर जिल्हा फ्लोअर बॉल संघटनेच्या सचिव स्नेहल भगत व जळगाव फ्लोअर बॉल संघटनेचे सचिव दीपक वाडे उपस्थित होते.

TheHitavada
Nagpur City Line | 2023-09-25 | Page- 4
ehitavada.com

CITYLINE

# City's Dr Payal Thaorey attends Dialogue on Human Rights, Local Governance in Manila



Dr Payal Thaorey (extreme left) with others during the Dialogue on Human Rights and Local Governance at Manila, Philippines.

...l, Post ...ching ...Law, ...aharaj ...MNU) ...st for ...uman ...ance ...eld in ...ntly. ...ealing ...inno- ...inte- ...based ...local ...with- ...tries. ...er dis- ...ep by ...e fol- ...ments ...chal- ...ing. ...Asia- ...South ...New Guinea, Bangladesh, Nepal and Philippines participated in the Regional Dialogue.

Dr Thaorey was the only panellist invited from India and represented RTM Nagpur University. This regional dialogue was organised by Raoul Wallenberg Institute of Human Rights and Humanitarian Law, Jakarta and supported by Swedish International Cooperation Development Agency (SIDA). Dr Thaorey has already completed three International Research Projects with Raoul Wallenberg Institute of Human Rights and Humanitarian Law, Sweden from 2020 till 2023.

Powered by iDocuments

# सिंथेटिक ट्रैक का लोकार्पण 17 को

नागपुर | शताब्दी वर्ष के उपलक्ष्य में राष्ट्रसंत तुकड़ोजी महाराज नागपुर विश्वविद्यालय के खेल परिसर में 'एथलेटिक्स' प्रतियोगिताओं के लिए एक अत्याधुनिक सिंथेटिक ट्रैक तैयार है। इस सिंथेटिक ट्रैक का रविवार, 17 सितंबर को दोपहर 2 बजे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस लोकार्पण करेंगे। कार्यक्रम अध्यक्ष विश्वविद्यालय के कुलगुरु डॉ. सुभाष चौधरी तथा प्रमुख अतिथि के रूप में प्र-कुलगुरु डॉं. संजय दुधे उपस्थित रहेंगे। लोकार्पण समारोह की शुरुआत आमंत्रित एथलीटों के साथ 4 बाय 100 मीटर की रिले से होगी। कुछ दिन पहले ही सिंथेटिक ट्रैक को अंतरराष्ट्रीय दर्जा मिला है। वर्ल्ड एथलेटिक्स संगठन के सीईओ जॉन रिडगॉन ने सिंथेटिक ट्रैक को अंतरराष्ट्रीय वर्ग-2 सर्वसुविधायुक्त ट्रैक का दर्जा प्रदान करते हुए प्रशस्ति पत्र दिया।

## ऐसा है ट्रैक

विश्वविद्यालय के इस सिंथेटिक ट्रैक में 400 मीटर की कुल आठ लेन हैं। पूर्व दिशा में गोला फेंक और भाला फेंक तथा पश्चिम में हथौड़ा फेंक प्रतियोगिता के लिए विशेष व्यवस्था की गई है। दक्षिण दिशा में दो स्थानों पर लंबी कूद और त्रिकूद के लिए जंपिंग सुविधा है। ट्रैक में स्टीपल चेस प्रकार के लिए भी विशेष सुविधाएं हैं। ट्रैक को नुकसान होने से बचाने के लिए ड्रेनेज सिस्टिम की व्यवस्था की गई है। एथलीटों और तकनीकी अधिकारियों को ट्रैक पर पहुंचने की अनुमति होगी। प्रतियोगिता से पहले अभ्यास के लिए मैदान के पूर्वी और पश्चिमी हिस्से में व्यवस्था की गयी है। इस मैदान पर दिन-रात मैच खेले जाएगे।



देशोन्नती

# पौष्टिक आहाराच्या दक्षतेबाबत जनजागृतीची ग

» डॉ. ए.एन. राधा यांचे प्रतिपादन » न्युट्रिशन सोसायटी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय संमेलन

लोकसत्ता — लोकमान्य लोकशक्ती

## डॉ. प्रमोद मुनघाटे यांची खंत; नागपूर विद्यापीठात गांधी जयंती सप्ताह

# वर्तमान काळात महात्मा गांधींबद्दल जाणीवपूर्वक विषपेरणी

लोकसत्ता प्रतिनिधी



नागपूर : वर्तमान काळात महात्मा गांधी यांना चुकीच्या पद्धतीने सादर करून विष पेरण्याचे काम होत आहे. युवा पिढीला चुकीच्या पद्धतीने महात्मा गांधी सांगण्याचा प्रयत्न जाणीवपूर्वक होत असल्याचा आरोप साहित्य अकादमीचे सदस्य डॉ. प्रमोद मुनघाटे यांनी केला. वर्तमान काळात महात्मा गांधी अध्ययनातून समजून घेण्याची गरज असल्याचे ते म्हणाले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात महात्मा गांधी विचारधारा विभागाच्या वतीने गांधी जयंती सप्ताह साजरा केला जात आहे. या सप्ताहात मंगळवारी डॉ. मुनघाटे मार्गदर्शन करीत होते. यावेळी आंतर विद्याशाखीय विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. प्रशांत कडू, महात्मा गांधी विचारधारा विभाग प्रमुख प्रमोद वाटकर, डॉ. स्मिता नाहतकर उपस्थित होते. 'अहिंसात्मक जीवन पद्धती : वर्तमान काळातील आवश्यकता' या विषयावर डॉ. मुनघाटे म्हणाले, महात्मा गांधी यांनी नागपूर येथे १९२० मध्ये झालेल्या अधिवेशनानंतर महिला, शेतकरी, कष्टकरी, सर्वसामान्य नागरिकांना स्वातंत्र्य आंदोलनात सहकार व सत्याग्रह ही साधने वापरून सहभागी करून घेतले. सहकार व सत्याग्रह यामध्ये सहभागी होत सामान्य नागरिकांना देखील देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात आपला सहभाग आहे, असे वाटते. देशाचे स्वातंत्र्य श्रमिक, सर्वसामान्य जनतेच्या ताब्यात महात्मा गांधी यांच्या माध्यमातून जात आहे. यामुळेच काही विशिष्ट संघटनांच्या माध्यमातून महात्मा गांधींचा द्वेष करणे सुरू झाले आणि सातत्याने द्वेष करणे सुरू आहे. महात्मा गांधी यांच्याकडे मुळातून पाहण्याची गरज तसेच अध्ययनातून त्यांना जाणून घेण्याची गरज असल्याचे डॉ. मुनघाटे पुढे बोलताना म्हणाले. महात्मा गांधी यांनी गौतम बुद्धाच्या करुणा व अहिंसेच्या विचाराचा सामूहिक प्रयोग भारतात अन्याय व शोषणाविरोधात लढताना केला. भगवद्गीतेतून विश्वरूप दर्शन व अद्वैतवाद म्हणजेच कणाकणात असलेल्या ईश्वराचा वास हे अहिंसा सिद्धांताचे महात्मा गांधी यांनी केलेले प्रयोग आहेत. महात्मा गांधी हे धार्मिक होते, हिंदू होते, मात्र त्यांच्या घरी, आश्रमात मंदिर किंवा मूर्ती नव्हती. महात्मा गांधी प्रार्थना करीत होते. मात्र, त्यांच्या प्रार्थनेत सर्वधर्माच्या प्रार्थनांचा समावेश होता. आत्मिक शुद्धता देणारी त्यांची धर्माची संकल्पना होती. दुसऱ्या धर्माविरोधात द्वेष बाळगतो तो धार्मिक असूच शकत नाही. जगातील सर्व धर्म सारखेच आहे, अशी शिकवण महात्मा गांधी यांनी दिली आहे. कार्यक्रमाचे संचालन डॉ. स्मिता नाहतकर यांनी केले तर आभार डॉ. गणेश ढोबळे यांनी मानले.

27/09/2023 | Nagpur | Page : 10
Source : https://epaper.loksatta.com



पुरामुळे प्रकाशन साहित्यासह यंत्रसामग्रीचे मोठ्या प्रमाणात नुकसान.

# विद्यापीठ मुद्रणालयात होते आठ फूट पाणी

म. टा. प्रतिनिधी, नागपूर

शहरात शनिवारी झालेल्या अतिवृष्टीचा फटका राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या ... मुद्रणालयात ... न साहित्य ... प्रमाणात ... छत्रपती ... रिसरात ... ण्याचा सततचा लोंढा आणि जोर ... यामुळे मुद्रणालयात आठ ... पाणी चढले होते. या पुराच्या ... मुद्रणालयातील प्रकाशन ... कागदपत्रे, यंत्रसामग्री य... प्रमाणात नुकसान झाले आ... फटका बसला आहे. कुलगुरु ... चौधरी यांनी मुद्रणालयाला ... यावेळी रासेयो संचालक डॉ ... पिसे, प्रकाशन अधिकारी प्र... मुद्रणालय कर्मचारी पां... यांच्यासह कर्मचारी उपस्थि...

लोकमत

## संकल्प समृद्धीचा, 'ती'च्या सन्मानाचा...



# 'गरजेनुसार बदलावे रासेयोचे स्वरूप'

## विद्यापीठस्तरीय पुरस्कारांचे वितरण



राष्ट्रीय सेवा योजनेचे पुरस्कारप्राप्त विद्यार्थी आणि कार्यक्रमाधिकाऱ्यांसह कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी, प्र-कुलगुरू डॉ. संजय दुधे, अधिसभा सदस्य दिनेश शेराम, रासेयो संचालक डॉ. सोपानदेव पिसे.

म.टा. प्रतिनिधी, नागपूर

राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वरुप प्रसंगानुसार तसेच गरजेनुसार बदलले पाहिजे. कौशल्य विकास, शेती विषयक मार्गदर्शन, हस्तकला, उद्योजकता विकास आदीबाबत समाजामध्ये जागृती निर्माण व्हावी, असे वातावरण तयार करावे, असे आवाहन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. ... नी केले. राष्ट्रीय सेवा ... र वितरण सोहळ्याच्या ... न ते बोलत होते. ... स्थित छत्रपती शिवाजी ... य परिसरातील दीक्षांत ... या सोहळ्याला प्रमुख ... -कुलगुरू डॉ. संजय ...

'तळागाळातील नागरिकांना शासकीय योजनांचा लाभ मिळावा या दृष्टिकोनातून रासेयोने काम करावे. वैद्यकीय सुविधा कौटुंबिकदृष्ट्या समाजाला मिळाव्या म्हणून मदत करावी. गावपातळी, महाविद्यालयीन स्तरावर या सर्व घटकांचा विस्तार करणे आवश्यक आहे', असे कुलगुरू म्हणाले. प्रास्ताविकात रासेयो संचालक डॉ. सोपानदेव पिसे यांनी विद्यापीठाच्या शताब्दीवर्षाच्या निमित्ताने विविध ... केले जात ... कलशपूजन करण्यात आले. सूत्रसंचालन प्रकाश शुक्ला यांनी केले व आभार मानले.

**रासेयो स्वयंसेवकांचा सन्मान**

या सोहळ्यात स्वयंसेवक गटात स्थानिक शासकीय ज्ञान विज्ञान संस्थेचा मनीष कडूकर, एलएडी कॉलेजची कोमल नागरूकर, समर्थ महाविद्यालय लाखनी येथील चंद्रहास खंडारे, एनएमडी कॉलेज येथील निखिल बनसोड या स्वयंसेवकांचा कुलगुरूंच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रम ... ताई गोळवलकर महाविद्यालयाचे डॉ. चंद्रमोहन सिंह, जे. एम. पटेल कॉलेज भंडारा येथील डॉ. भोजराज श्रीरामे, डी. बी. सायन्स कॉलेजचे डॉ. गुणवंत गाडेकर, न्यू आर्टस् कॉमर्स अँण्ड सायन्स कॉलेजचे डॉ. हेमंत मिसाळ या कार्यक्रमाधिकाऱ्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. महाविद्यालय श्रेणीमध्ये डॉ. एन. के. उमाठे कॉलेज, ताई गोळवलकर महाविद्यालय, जे. एम. पटेल कॉलेज भंडारा, डी. बी. सायन्स कॉलेज व न्यू आर्ट्स कॉमर्स अँण्ड सायन्स कॉलेज येथील प्राचार्यांचा ...

नवभारत

## आमंत्रित एथलीटों की 4x100 मी. मिश्रित रिले दौड़ होगी

# 17 को सिंथेटिक ट्रैक का उद्घाटन



**विश्व स्तरीय ट्रैक की विशेषताएं**

विवि के सिंथेटिक ट्रैक में 400 मी. की कुल 8 लेन हैं. पूर्व दिशा में गोला और भाला फेंक तथा पश्चिम में हथौड़ा फेंक प्रतियोगिता के लिए विशेष व्यवस्था की गई है. दक्षिण में 2 स्थानों पर लॉन्ग जम्प और ट्रिपल जम्प के लिए जंपिंग पिट हैं. ट्रैक पर स्टीपलचेज के लिए विशेष सुविधाएं हैं. इसे क्षतिग्रस्त होने से बचाने के लिए ड्रेनेज सिस्टम की व्यवस्था की गई है. एथलीटों और तकनीकी अधिकारियों को ट्रैक तक पहुंचने की अनुमति होगी.

■ नागपुर, खेल प्रतिनिधि. नागपुर विश्वविद्यालय के खेल परिसर में 'एथलेटिक्स' प्रतियोगिताओं के लिए बने ... का उद्घाटन उपमुख्यमंत्री ... मी. मिश्रित रिले दौड़ से होगा. यह जानकारी क्रीड़ा विभाग के संचालक डॉ. शरद सूर्यवंशी ने दी. उन्होंने ... ट्रैक को हाल ही में अंतरराष्ट्रीय एथलेटिक्स एसोसिएशन ने सिंथेटिक ट्रैक को ... लेटिक्स फैसिलिटी ट्रैक ... नत किया है.

The Hitavada

# DCM Fadnavis dedicates synthet...

## Team Mistry wins 4x100m rel...

लोकमत समाचार

## 'ती' चा गणपति सम्मान के लिए आज घर-घर आरती

#LokmatTichaGanpati

# भंडाऱ्यात 'ग्राम चलो'

नागपूर विद्यापीठ राबविणार विविध योजना, 'रिचिंग टू अनरिच्ड' संकल्पना

म.टा.प्रतिनिधी, नागपूर

LOKMAT TIMES

## IN THE ALMIGHTY'S PRESENCE



Ramtek MP Krupal Tumane, Revatitai Tumane, vice chancellor of RTMNU Dr Subhash Chaudhary, Rasika Chaudhary, dean of faculty of interdisciplinary studies Dr Prashant Kadu, director of innovation, incubation & linkages Dr Rajesh Singh, Dr Priti Singh and local management committee members of Dadasaheb Kalmegh Dental College and Hospital and directors of Shivaji Shikshan Sanstha Hemant Kalmegh and Archana Kalmegh at Lokmat 'Ti Cha Ganpati'.

# म. गांधीनी मांडली स्वातंत्र्योत्तर भारताची ब्ल्यू प्रिंट

» भुजंग बोबडे यांचे प्रतिपादन

देशोन्नती वृत्तसंकलन...

## सत्याचे प्रयोग सिद्ध

# विद्यापीठाच्या सिंथेटिक ट्रॅकचे थाटात लोकार्पण

देशोन्नती

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांशी समाजकार्याला जोडणे महत्त्वाचे

» डॉ. सुखदेव थोरात यांचे प्रतिपादन

ई मासिक विद्यासंवाद
सप्टेंबर २०२३| आवृत्ती-०३ब

## विद्यापीठ गीत

या भारतात बंधुभाव नित्य वसू दे ।
दे वरचि असा दे ।
हे सर्व पंथ-संप्रदाय एक दिसू दे ।
मतभेद नसू दे ।। धृ.।।

नांदोत सुखे गरीब-अमीर एकमतांनी ।
मग हिंदु असो ख्रिश्चन, वा हो इस्लामी ।
'स्वातंत्र्यसुखा' या सकलांमाजि वसू दे ।
दे वरचि असा दे ।। १ ।।

सकळांस कळो 'मानवता, राष्ट्रभावना' ।
हो सर्वस्थळी मिळुनि 'समुदाय-प्रार्थना' ।
उद्योगि तरुण वीर, शीलवान दिसू दे ।
दे वरचि असा दे ।। २ ।।

हा जातिभाव विसरुनिया एक हो आम्ही ।
अस्पृश्यता समूळ-नष्ट हो जगातुनी ।
खळ-निंदका-मनीहि 'सत्य-न्याय' वसू दे ।
दे वरचि असा दे ।। ३ ।।

सौंदर्य रमो घरघरांत स्वर्गियापरी ।
ही नष्ट होऊ दे विपत्ती, भीति बोहरी ।
तुकड्यास सदासर्वदा सेवेस कसू दे ।
दे वरचि असा दे ।। ४ ।।

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज**




**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर**

जमनालाल बजाज प्रशासकीय भवन, महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परिसर, कॅम्पस चौक ते अंबाझरी टी-पॉईंट मार्ग, नागपूर-४४० ०३३.
दूरध्वनी : ९१-७१२-२९५६३०४ ईमेल : registrar@nagpuruniversity.nic.in वेबसाईट : www.nagpuruniversity.ac.in